cmyk

## संपादकीय

### महाराष्ट्रासाठी भूषणावह

सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे देशाच्या सरन्यायाधीशपदी काम करणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांची जागा ते घेतील. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या नावाची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदासाठी झालेली शिफारस महाराष्ट्रासह समस्त मराठी जनांसाठी भूषणावह म्हटली पाहिजे. न्या. गवई यांच्याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. शरद बोबडे, न्या. उदय लळित आणि न्या. धनंजय चंद्रचूड या मराठी न्यायाधीशांना सरन्यायाधीश म्हणून काम करण्याचा बहुमान लाभला होता.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३५४ | शनिवार, दि.१९ एप्रिल २०२ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### जगन मोहन रेड्डी यांच्यावर ईडीची मोठी कारवाई

हैद्रबाद  आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर ईडीकडून शुक्रवारी (दि.१८) मोठी कारवाई करण्यात आली. सुमारे १४ वर्षे जुन्या मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने जगन रेड्डी यांची ८०० कोटी रूपयांची जमीन मालमत्ता आणि शेअर्स जप्त केले आहेत. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद युनिटने आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांचे २७.५ कोटी रुपयांचे शेअर्स तात्पुरते जप्त केले आहेत. वायएसआर काँग्रेस पक्षप्रमुखांच्या शेअर्ससह, केंद्रीय एजन्सीने त्याच प्रकरणात दालमिया सिमेंट्स (भारत) लिमिटेड (डीसीबीएल) यांच्या मालकीची ३७७.२ कोटी रुपयांची जमीनदेखील जप्त केली आहे. ईडीने जप्त केलेली मालमत्ता ७९३.३ कोटी रुपयांची असल्याचेदेखील डीसीबीएलने म्हटले आहे.

# राज्यात ६५ नव्या कृषि उत्पन्न बाजार समिती



## राज्य सरकारचा निर्णय, २१ जिल्ह्यांमधील ६५ तालुक्यांचा समावेश

**मुंबई | प्रतिनिधी**

राज्य सरकारने नव्याने ६५ तालुक्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याचा तत्वत: निर्णय घेतला आहे. यामध्ये २१ जिल्ह्यांमधील ६५ तालुक्यांचा समावेश आहे. राज्यात एकूण ३५८ तालुके आहेत. तालुकास्तरावर शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री कृषी उत्पन्न बाजार समिती योजना राबवली जाते. या योजनेतून ज्या तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती नाही, त्या तालुक्यात बाजार समिती स्थापन केली जाते.

राज्यात महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) ◀◀ पान २ वर

### बीड जिल्ह्यातून शिरूर तालुक्याचा समावेश

शासनाने घेतलेल्या निर्णयात बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्याचा समावेश आहे. शिरूर कासार हा तालुका ग्रामीण भागात असल्याने या तालुक्यात मुख्य व्यवसाय हा शेतीच आहे. या तालुक्यातील शेतकऱ्यांना पाटोदा कृषी बाजार समितीत जावे लागत होते. मात्र आता शिरूर येथेच कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन होणार असून, याचा तालुक्यातील शेतकऱ्यांना चांगला फायदा होणार आहे.

# धनंजय मुंडेंच्या आमदारकीविरुद्ध न्यायालयात जाणार

## शरद पवार गटाचे विरोधी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांची घोषणा





### “ ईव्हीएमसोबत छेडछाड, न बोलण्यासाठी १० लाख पाठवले – कासले



परळीत ईव्हीएमसोबत छेडछाड करण्यात आली, त्यासाठीच मला बाजूला करण्यात आले आणि नंतर अकाऊंटवर १० लाख रुपये देण्यात आल्याचे निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी सांगितले. वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी धनंजय मुंडे यांची ऑफर होती असा आरोप त्यांनी पुन्हा एकदा केला. रंजीत कासले यांनी बीड पोलिसांना शरण जाण्यापुर्वी पुणे विमानतळावर माध्यमांशी संवाद साधला. यामध्ये धनंजय मुंडेपासून ते मुख्यमंत्री फडणवीसांपर्यंत आणि बीड पोलिसांपासून ते आयएएस–आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांवर आरोप केले. रणजीत कासले म्हणाले की, निवडणुकीच्या दिवशी, २१ नोव्हेंबर रोजी संत बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या नावाने माझ्या अकाऊंटवर १० लाख रुपये आले. परळीमध्ये ईव्हीएम ज्या ठिकाणी होते. त्या ठिकाणी माझी ड्युटी होती. ईव्हीएममध्ये छेडछाड करण्यात येणार आहे, त्यामुळे तुम्ही यापासून दूर राहा असे वाल्मिक कराडने आपल्याला सांगितले. लोकसभेवेळी मी बोगस मतदान होऊ दिले नव्हते. विधानसभेवेळी धनंजय मुंडे यांची कॅश पकडली होती. त्यामुळेच मला बाजूला करण्यात आले. मला वरून आराम करण्याची ऑर्डर आली आणि ईव्हीएमच्या ड्युटीमधून बाजूला करण्यात आले.

**बीड | पतिनिधी**

विधानसभा निवडणुकांमध्ये आमदार धनंजय मुंडेंच्या निकटवर्तीयांकडून झालेल्या गुंडगिरीमुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीने गंभीर आरोप केले होते. त्यानंतर, सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यात तीव्र संतापाची लाट उसळल्यानंतर धनंजय मुंडेंना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले. आता, बीडमधील निलंबित पोलीस निरीक्षक रंजीत कासले यांनी धनंजय मुडेंवर गंभीर आरोप केले आहेत. तसेच, त्यांच्या माणसांकडून माझ्या बँक अकाऊंटवर १० लाख रुपये टाकण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्यावरुन, आता परळी मतदारसंघातील शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे विधानसभा उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी न्यायालयात दाद मागणार असल्याचे ◀◀ पान २ वर

### “ रंजीत कासलेला बीड पोलिसांनी केली अटक

विधानसभा निवडणुकांवेळी परळी मतदारसंघात ईव्हीएमसोबत छेडछाड करण्यात आली, त्यासाठीच मला बाजूला करण्यात आले आणि नंतर अकाऊंटवर १० लाख रुपये देण्यात आल्याचे निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी म्हटले. तसेच, वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी धनंजय मुंडे यांची ऑफर होती असा दावाही त्यांनी पुन्हा एकदा केला. रणजीत कासले हे पुणे विमानतळावर आल्यानंतर त्यांना बीडच्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यामध्ये धनंजय मुंडेपासून ते मुख्यमंत्री फडणवीसांपर्यंत आणि बीड पोलिसांपासून ते आयएएस–आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांवर रंजीत कासले यांनी गंभीर आरोप केले आहेत.

### कासलेला तीन दिवसांची पोलिस कोठडी

निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले सध्या बीड पोलिसांच्या ताब्यात आहे. त्याला पुण्यातून अटक केल्यानंतर बीडला आणण्यात आले होते. दरम्यान, त्याला पोलिसांनी कोर्टात हजर केले. पोलिसांनी त्याच्या ११ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने कासलेला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.



### भाजपाने महाराष्ट्रात गाठला सदस्य नोंदणीचा दिड कोटीचा टप्पा

**मुंबई | प्रतिनिधी**

**संघटन पर्वाअंतर्गत भारतीय जनता पार्टीचे दीड कोटींहून अधिक प्राथमिक सदस्य आणि १ लाख ३४ हजारांहून अधिक सक्रीय सदस्यांच्या नोंदणीचे उद्दीष्ट साध्य करून महाराष्ट्र भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान ऐतिहासिक ठरले आहे, अशा शब्दांत भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस (मुख्यालय) खा.अरुण सिंह यांनी महाराष्ट्रातील भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संघटन पर्व यशस्वी ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये खा. अरूण सिंह बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, राजेश पांडे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ता ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. ◀◀ पान २ वर

# आता अपघातग्रस्तांवर एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार

## आरोग्यमंत्री आबिटकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई | प्रतिनिधी**

अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार करा, असे निर्देश राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी (दि.१८) दिले. जन आरोग्य योजनेच्या आढावा बैठकीत मंत्री आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना या संदर्भातील सूचना दिल्या.

अपघातग्रस्तांना तातडीने उपचार देण्यासाठी अंगीकृत आणि अन्य रुग्णालयांनी, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असेदेखील आरोग्यमंत्री आबिटकर यांनी म्हटले. पुढे त्यांनी रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी रुग्णालये, संस्थांनी दक्षता बाळगावी. गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा ◀◀ पान २ वर

### छत्तीसगडमध्ये २२ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

रायपूर : छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात एका नक्षल दाम्पत्यासह एकूण २२ नक्षल्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याचे समोर आले आहे. शासनाच्या नक्षल सदस्य मुक्त ग्राम पंचायत अंतर्गत २२ नक्षल्यांना आत्मसमर्पण करविण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांवर एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते. आत्मसमर्पित १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ८–८ लाख, १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ५–५ लाख, २ पुरूष व ५ महिला २–२ लाख, १ पुरूष नक्सल वर ५० हजार असे एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित होते.

### बिहार विधानसभा निवडणूकीत ‘इंडिया’ आघाडीचे नेतृत्व तेजस्वी यादवकडे

**नवी दिल्ली| वृतसंस्था**



बिहारमध्ये होत असलेल्या आगामी विधानसभेच्या निवडणूकीत राजदचे नेते व माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव हे इंडीया आघाडीचे नेतृत्व करणार आहेत. ‘इंडीया’ आघाडीच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पण आघाडीने आपला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून कोणाचेच नाव घोषीत केलेले नाही. यावर्षी ऑक्टोबर किवा नोव्हेंबर महिन्यात बिहार विधानसभेच्या निवडणूका होत आहेत. या आघाडीमध्ये सामिल झालेले पक्ष पुन्हा एकदा एकत्र बैठक घेऊन जाहीरनामा व कोणाला किती जागा मिळणार याचा विचार करुन नंतर घोषणा करण्यात येणार आहे. या आघाडीमध्ये काँग्रेस, राजद, भाकप, भाकप (मार्क्सवादी–लेनीनवादी) भाकप (मार्क्सवादी) आणि विकासशील इन्सान पार्टी या सहा पक्षांचा समावेश आहे. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ एप्रिल २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.०० क्विंटल | २,४९० | ३,००० | २,६९७ |
| ज्वारी/हायब्रिड : १५३.५० क्विंटल | १,७०० | ३,२६० | २,४६१ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : २.५० क्विंटल | ६,४०२ | ६,९०१ | ६,७०१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६६.०० क्विंटल | २,०७० | ३,०७० | २,५२६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,४०० | ४,४५० | ४,४३३ |
| हरभरा: १२.५० क्विंटल | ५,४७० | ५,५१७ | ५,४९३ |

# कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी शासन प्रयत्नशील

## मंत्रालयात आयोजित केलेल्या कार्यशाळेत कृषीचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचे मार्गदर्शन

**मुंबई | प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करून राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, यासाठी शासन आग्रही असल्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सांगितले.

मंत्रालय येथे कृषी विभागाने कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित केली होती यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी बोलत होते. प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, केंद्र शासन आणि महाराष्ट्र ◀◀ पान २ वर

# घाटशीळ पारगाव येथे मुख्यमंत्री फडणवीस यांचा दौरा

## श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या नारळी सप्ताहाची सांगता

**शंकर भालेकर | शिरूर**

तालुक्यातील घाटशील पारगाव येथील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह सुरु असून त्याची सांगता शनिवार दि.१९ एप्रिल रोजी महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होत आहे. या सांगतेच्या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे याही सप्ताहाला उपस्थित राहणार असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.



शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री.क्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या सात दिवसापासून भव्य स्वरूपात नारळी सप्ताह पार पडत आहे. महंत विठ्ठल महाराज शास्त्री आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चांगले संबंध असल्यामुळे विठ्ठल महाराज शास्त्री यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घाटशीळ पारगाव येथील नारळी सप्ताहाच्या सांगतेला निमंत्रण दिलेले आहे. या निमंत्रणावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्या दि. १९ एप्रिल रोजी श्री. संत वामनभाऊ महाराज यांच्या पादुकांचे दर्शन व महंत विठ्ठल महाराज य शास्त्री यांचे दर्शन आशिर्वाद घेण्यासाठी तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे ◀◀ पान २ वर

# बनकरंजा येथील दलित वस्तीच्या १८ लाखाच्या कामात भ्रष्टाचार

## अधिकारी, गुत्तेदार यांच्या संगणमताने बोगस काम करून निधी हडप करण्याचा प्रयत्न

### नालीची आवश्यकता असताना बसवले एलईडी ; एलईडी बसवताना नियम धाब्यावर

**केज | प्रतिनिधी**

**केज तालुका येथील बनकरंजा गावांतर्गत दलित वस्ती साथी १८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर असताना या निधीचा निव्वळ गुत्तेदार आणि अधिकारी यांनी बोगस काम करून पैसे उचलण्याचा प्रकार समोर आला आहे बनकरंजा गाव अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर या दोन ठिकाणी नाली काम आवश्यक असताना अवघ्या १५ ते १० फुटामध्ये एलईडी बल्ब बसवून पैसे उचलण्याचा प्रकार सुरू आहे हा शासनाचा निधी योग्य प्रकारे वापरण्यात यावा व अधिकारी गुत्तेदार यांच्यावर चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.**





दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर या भागात पहिलेच एलईडी लाईट चालू असताना पोलशेजारी पोल उभे करून निव्वळ पैसे उचलून स्वत:चं घर भागवण्यासाठी अधिकारी व गुत्तेदार यांनी या निधीचा चुकीचा प्रकारे वापर केल्याचा दिसून ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# महाराष्ट्रासाठी भूषणावह

सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे देशाच्या सरन्यायाधीशपदी काम करणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांची जागा ते घेतील. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या नावाची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदासाठी झालेली शिफारस महाराष्ट्रासह समस्त मराठी जनांसाठी भूषणावह म्हटली पाहिजे. न्या. गवई यांच्याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. शरद बोबडे, न्या. उदय लळित आणि न्या. धनंजय चंद्रचूड या मराठी न्यायाधीशांना सरन्यायाधीश म्हणून काम करण्याचा बहुमान लाभला होता.

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना हे निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर आता गवई यांच्या रूपाने पुन्हा मराठी भाषक व्यक्तीकडे सरन्यायाधीशपदाची सुत्रे जाणार, हे निश्चित झाले आहे. न्या. गवई यांची एकूणच कारकीर्द ही प्रेरणादायी म्हणायला हवी. त्यांचा जन्म १९६० चा. केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल आणि दिवंगत रिपब्लिकन नेते रा. सू. गवई यांचे ते ज्येष्ठ सुपुत्र. १९८५ मध्ये ते बार असोसिएशनमध्ये रूजू झाले. १९८७ पर्यंत उच्च न्यायालयाचे महाधिवक्ता म्हणून त्यांनी केलेले काम उल्लेखनीय मानले जाते. १९८७ ते १९९० या काळात मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली करण्याचा अनुभवही त्यांच्यासाठी एकूण कारकिर्दीला कलाटणी देणारा ठरावा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायमूर्ती म्हणून कार्य करताना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण जनहित याचिकांवर निर्णय देत नागपूर व विदर्भाच्या विकासाला चालना दिली. नागपूर व अमरावती महानगरपालिका तसेच अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील म्हणूनही त्यांनी मोलाची भूमिका बजावली. ९० नंतर त्यांनी प्रामुख्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर वकिली केली. अमरावती व नागपूर महापालिकेसह अमरावती विद्यापीठ, विविध स्वायत्त संस्था, महामंडळे आणि विदर्भातील विविध नगरपरिषदांची बाजू विविध प्रकरणांमध्ये त्यांनी ज्या पद्धतेने मांडली, त्यातून त्यांचा अभ्यासूपणा आणि कायद्याचे सखोल ज्ञानच अधोरेखित होत आले आहे. खरे तर घटनात्मक कायदा आणि प्रशासकीय कायदा हा त्यांच्या आवडीचा विषय. या स्तरावरील त्यांच्या अभ्यासामुळे कायदेतज्ञ म्हणून त्यांनी ऐन पस्तीशीतच लौकिक प्राप्त केल्याचे सांगण्यात येते. १९९२ ते ९३ या काळात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांनी काम केले. तर २००० मध्ये सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या सर्व भूमिकाही त्यांनी अत्यंत निस्पृहपणे व प्रामाणिकपणे पार पाडल्या. २००३ मध्ये अतिरिक्त न्यायाधीश, तर २००५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती गवई यांची झालेली नियुक्ती हादेखील एक महत्त्वाचा टप्पा मानायला हवा. पुढे सर्वोच्च न्यायालयातही त्यांचे पाऊल पडले आणि आता सरन्यायाधीश म्हणूनही ते काम करणार आहेत. सरन्यायाधीश म्हणून त्यांना सहा महिन्यांचा कालावधी मिळेल. हा कालावधी लहान असला, तरी न्या. गवई यांचा लौकिक लक्षात घेता या काळातही त्यांच्याकडून महत्त्वाचे निर्णय होऊ शकतील. आजपर्यंत न्या. गवई यांनी अनेक क्रांतिकारक निकाल दिले आहेत. कलम ३७० रद्द वरून अनेक मतमतांतरे होती. परंतु, हे कलम रद्द करण्याचा निर्णय डिसेंबर २०२३ मध्ये वैध ठरवला, तो न्या. गवई यांनीच. मुख्य म्हणजे निवडणूक रोखे योजना अवैध ठरविणाऱ्या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता. मोदी सरकारच्या कारकिर्दीतील नोटबंदी बरीच वादग्रस्त ठरली होती. तथापि, नोटबंदी वैध असल्याचा निर्णय ज्या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला, त्यात न्या. गवई यांचाही समावेश असल्याचे दिसते. अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा राज्यांचा अधिकार असल्याचा निर्णय ज्या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला, त्यातही त्यांचा समावेश होता. यातून अत्यंत दूरगामी व महत्त्वपूर्ण निकालांमध्ये त्यांनी किती मोलाची भूमिका निभावली, हे लक्षात येते.

न्यायालयाच्या विश्वासार्हतेवर न्या. गवई बोलत असतात. न्यायिक अधिकाऱ्यांच्या वार्षिक परिषदेत बोलताना गवई यांनी याबाबत मांडलेली मते आजही दिशादर्शक ठरावीत. पदावर असताना न्यायाधीशाने राजकारणी आणि नोकरशाहीची स्तुती केल्याने संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कमी होऊ शकतो. निवडणूक लढवण्यासाठी न्यायमूर्तींनी राजीनामा दिल्याने लोकांच्या निष्पक्षतेच्या धारणेवर परिणाम होऊ शकतो, ही त्यांनी व्यक्त केलेली भीती वास्तववादीच म्हटली पाहिजे. न्यायालयीन नीतिमत्ता आणि सचोटी हे कायदेशीर व्यवस्थेची विश्वासार्हता टिकवू ठेवणारे मूलभूत आधारस्तंभ असल्याकडेही ते लक्ष वेधतात. लोकांचा राजकारणी, नोकरशहांवरील विश्वास दिवसेंदिवस उडत चालला आहे. कायद्याबद्दल लोकांच्या मनात साशंकता आहे. काही प्रमाणात न्यायव्यवस्थेवर विश्वास असला, तरी मनात संशय उत्पन्न झाला आहे, हे नक्की. लोकशाहीचा बेस लोक किंवा जनता आहे. म्हणूनच जनतेचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कायम ठेवणे महत्त्वाचे होय. त्यांच्या निर्णयांचा प्रभाव आरोग्य, पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन तसेच शिक्षण या क्षेत्रांवर निश्चितपणे दिसून आलेला आहे. न्या. भूषण गवई याची जाणीव असणाऱ्या न्यायाधीशांपैकी एक आहेत. म्हणूनच त्यांच्याकडून पुढच्या काळात सर्वांच्याच अधिक अपेक्षा असतील. देशात राजकारण, समाजकारणासह सगळ्याच क्षेत्रातील वातावरण सध्या ढवळून निघाले असून, अनेक ताणेबाणे निर्माण झाल्याचेही दिसते. हे पाहता सरन्यायाधीशपदाची जबाबदारी तितकीच आव्हानात्मकही असेल. ती ते यशस्वीपणे पार पाडतील हे नक्की.

# वाढत्या शिक्षक आत्महत्त्या; शासन प्रशासन आणि संस्थाचालक जबाबदार

जालना । प्रतिनिधी

**आपल्या संस्कृतीमध्ये गुरु या शब्दाला आणि व्यक्तीला फारच महत्वाचे स्थान आहे .माणसाला माणूस म्हणून तयार करण्यामध्ये शिक्षकाची महत्वाची भूमिका आहे . शिक्षक समाजशील माणूस तयार करण्याचे कार्य करत असतो. समाज बदलत गेला तसा गुरु सुद्धा कालानुरूप बदलत आहे.**

शिक्षक कभी सामान्य नही होता निर्माण और प्रलय उसके गोद मे पलते है असे आर्य चाणक्य म्हणतात. या गुरुना अनादी काळापासून राज सत्ता हेटाळणीचा सामना करावा लागला आहे आज सुद्धा हे सत्यच आहे . इसवी सन २००० साली शासनाने कायम विना अनुदानित धोरण लागू केले आणि शिक्षण क्षेत्राचे वाटोळे व्हायला सुरुवात झाली . राज्यातील गोरगरीब शेतकरी शेतमजुर भूमिहीन बहुजनांचे लेकरे गुरुजी होता यावे म्हणून या कायम विना अनुदानित शिक्षण शाळेत लाखो रुपये डोनेशन देऊन शिक्षक झाले आणि खर्या अर्थाने मृत्यूच्या सापल्यात अडकले २००० साली कायम शाळा सुरू झाल्या आणि प्रचंड संघर्षानंतर २०१८ साली २०% पगार काही कर्मच्याऱ्यांच्या खात्यावर जमा व्हायला सुरुवात झाली आज २०२५ या सालात सुद्धा त्या शाळा १००% वेतन अनुदानावर आल्या नाहीत हीच खरी शोकांतिका आहे . या टप्प्याचं राजकारणात आणि आपल्यात कर्मचारी अडकला आणि त्यांची अवस्था चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यू सारखीच झाली . सरकार कोणाचे ही असो शिक्षक टप्पा ठप्पच राहिला. या सर्वात भर म्हणून प्रशासन कायम त्यांच्या अडचणी वाढवते प्रशासन नोटाशिवाय चालतच नाही त्यामुळे शिक्षक आणखीन त्रस्त झाले माहिती मागविण्याच्या नावाखाली कागद गोळा करण्याचा प्रशासनाला छंदच झाला आहे.आजतगायतपर्यंत एकच माहिती पुन्हा पुन्हा मागण्याचा जागतिक विक्रम आपल्या राज्यात आहे पुन्हा मूल्यांकन पुनर्मुल्यांकन या गोंडस नावाखाली माहिती मागवण्याचा आणि नोटाचा भडीमार करायचा पण पुढचा टप्पा काही नाही द्यायचा. अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसाराचा गाडा कसा ओढतात यावर महाभारतासारखा एक ग्रंथ तयार होऊ शकतो .शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान कार्य झाल्यानंतर हे कर्मचारी तुम्हाला वेगवेगळ्या भूमिकेत दिसतील . वेटर, दुकानात, सिमेंट उचलणारा,चहाची टपरीवर कपबशी विसलतांना तरी या शासनाला आणि समाजाला जाग येत नाही संपूर्ण जगाच्या इतिहासात आणि वर्तमानात महाराष्ट्र सोडून २० २० वर्ष कामाचे दाम न घेता गप्पगुमान काम करणारे अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मला दाखवून द्या .भारतात नोकरी देण्याचे काम राष्ट्रपती सुद्धा करू शकत नाहीत पण कायद्याने संस्थाचालकांना नोकरी देण्याचा अधिकार मिळाला आणि इथेच खरा घोटाळा झाला . हा अधिकार देताना डोळ्यासमोर भाऊराव पाटलांचा आदर्श होता पण आता संस्थाचालक कोण आहेत राजकारणी नाक्यावर नेत्यांच्या मागेपुढे लाळ घोटणारे शिक्षण क्षेत्रात काम करणारे अधिकारी हे आहेत . काही संस्था आणि संस्थाचालक अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्य करतात हे सुद्धा मान्य करायलाच पाहिजे. परंतु २० २० लाख डोनेशन घेणारे,कर्मचाऱ्यांना घरी , शेतावर , गाडीवर ड्राइवर, स्वतः चा , इंग्लिश शाळेवर ,अश्या संस्थाचालकाची संख्या जास्त आहे . एक संस्थाचालक महाशयांनी तर शासकीय अनुदानावर गायी घेतल्या शाळेवर गायी सांभाळतात गाईची सर्व सेवा म्हणजे शेण काढण्यापासून ते दूध साहेबांच्या घरी नेवून देण्यापर्यंतचे कामासाठी सकाळी एक आणि रात्री एका शिक्षकाची नेमणूक केली आहे.आणि विशेष म्हणजे गाय पालनाचे पुण्य मात्र साहेबांनाच मिळते बर. हे संस्थाचालक महाभाग या शिक्षकांचा वापर फक्त संडासात असणाऱ्या टमरेलसारखाच करतात शिक्षकांच्या पगारी तुंबवायच्या आणि त्या काढण्यासाठी मोठी रक्कम मागायची प्रशासनाला थोडीशी मलाई मिळते म्हणून ते ही खुश म्हणजे प्रशासकीय अधिकारी १० रुपये मागितले तर हे कर्मचाऱ्यांकडून १००० लुटतात.शाळेवर नोकरी करणाऱ्यामध्ये यांच्या घरातले अर्धे लोक असतात . भाऊ बहीण भावाची बायको बहिणीचा नवरा साली साला पुतण्या भाचा आणि महत्वाचे म्हणजे हे कधीच शाळेवर फिरकत नाहीत आणि आले तरी राजेशाही थाटातच. दर महिन्याला इमारत भाडे नावाखाली प्रत्येक कर्मचाऱ्यांना दर महिन्याला सरासरी एक हजार द्यावेच लागतात.पुन्हा आता नवा ट्रेंड सुरू आहे त्यासाठी पुन्हा पैसा. कामासाठी लागणारे सर्व खर्च शिक्षकांनीच करावेत असा दंडक आहे . पुन्हा संस्थाचालक किंवा नातेवाईकांच्या वाढदिवस असल्यास हमखास सोनेच द्यावे लागते असा सारा विचार केल्यास कर्मचाऱ्यांना एका वर्षात ९ महिनाचाच वेतन मिळते संस्थाचालकच्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर बिनबुडाचे आणि तथ्यहीन आरोप लावले जातात मग निलंबन चौकशी समिती नेमली जाते. चौकशी समिती हा एक संशोधनाचा विषय आहे. छत्रपती संभाजीनगर या एका जिल्ह्यात चौकशी समिती मधे एकच व्यक्ती आदर्श म्हणून सापडतो तो सुद्धा १५ वर्षापूर्वी सेवा निवृत्त झालेला आहे तो चालतो कारण नियमात वयाचा उल्लेख नाही बर आदर्श शिक्षक तोच,तोच आदर्श मुख्याध्यापक आणि चौकशी समितीचा निर्णय पण अगोदरच ठरलेला असतो मग कोर्ट प्रकरण सुरू होते. म्हणजेच संस्थाचालकाचे म्हणणे नाही ऐकले तर चौकशी समीती लागलीच समजा.जे चौकशी समिती सदस्य असतात ते देवून घेवून चौकशी करतात म्हणजे आमचे ऐकले नाही तर लावतो चौकशी.म्हणजेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा कानपट्टी वर बंदूकच आहे कायम महात्मा फुले यांनी शेतकरी कसा नागवला जातो हे त्यांच्या लिखाणातून स्पष्ट केले अगदी तसेच साहित्य शिक्षण क्षेत्रात निर्माण होईल असे वाटते .शिक्षक हा अत्यंत भित्रा मध्यमवर्गीय प्राणी आहे . नोकरी लागली की तो एक कोश तयार करतो. आणि घाबरत घाबरत कधी शासनाला कधी कधी प्रशासनाला आणि कायमपणे संस्थाचालकाला घाबरत असतो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासन प्रशासन आणि संस्थाचालक पोटावरच मारतात त्यांची अडचण अशी आहे की त्यांचे प्रतिनिधी ज्यांना त्यांनी निवडून दिलेले आहे ते काहीच न करता चुप्पी साधत असतात.येत्या कालावधीत शिक्षकाच्या अनुदान आणि पेंशन आणि संस्थाचालक यांच्याकडून होणारा आर्थिक व मानसिक त्रास यामुळे आत्महत्त्या वाढणार आहेत.

# अतिवृष्टी अनुदान हडपणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करा-विनायक चोथे

अंबड । प्रतिनिधी

**अंबड व घनसावंगी तालुक्यातील मायबाप शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी अनुदानाचे पैसे महसूल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, मंडळअधिकारी व कृषी सहाय्यक यांनी संगमताने व्ही के नंबर च्या माध्यमातून घोळ घालुन परस्पर लाटले आहे. यामुळे या घोटाळ्यातील दोषीवर कार्यवाही करण्यात यावी, तीन वर्षे विलबाने मिळणारा पीकविमा वेळेत देण्यात यावा याचप्रमाणे संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी या मागण्याकरिता शिवसेना व युवासेना यांच्या वतीने शिवसेना कार्यालय, कोर्ट रोड, येथून तहसील कार्यालय पर्यत धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी तालुक्यातीला शिवसेना व युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी घोषणांनी शहर दुमदुमले या मोर्च्याचे रुपातर नंतर सभेत झाले यावेळी मराठवाडा युवा सेना सचिव श्री विनायक चोथे यांनी मार्गदर्शन केले ते म्हणाले कि असमानीने संकटानी बेजार असलेला बळीराजा, व त्यात चालू असणाऱ्या शेतकरी आत्महत्या या वर सरकारने तोडगा न काढता खोटी कर्ज माफीचे आस्वासन दिले. असून अनेक योजनेकरिता पैसे नसताना देखील केवळ आश्वासने देऊन सर्वसामान्यांना वेठीस धरले जात आहे. अंबड व घनसावगी तालुक्यातील २०२२-२३ चे अतिवृष्टीचे व २०२३-२४ चे दुष्काळी अनुदान १३२५ कोटी रुपये वाटले मात्र प्रत्यक्षात अनुदानाचे पैसे महसूल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, मंडळअधिकारी व कृषी सहाय्यक यांनी संगमताने व्ही के नंबर च्या माध्यमातून घोळ घालुन संगमत करून परस्पर लाटले आहे.**

पैसे घेतल्या शिवाय आज कोणतेही कामे शेतकऱ्याची केली जात नाहि शिवाय आज स्थानिक स्वराज्य संस्थेवर प्रशासन असल्याने शेतकऱ्यांना कोणाकडे दाद मागावी हा प्रश्न पडला असून अधिकारीच आपल्या नेमलेल्या व्यक्तीच्या साह्याने पैसे घेऊन शेतकऱ्यांची लुटमार करत आहे. या सर्व घोटाळ्याची योग्य चौकशी करून दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करून निलबित करावे व त्याच्या संपत्ती जप्त करून वसुली करण्यात यावी अशी मागणी करण्यात यावेळी करण्यात आली. याशिवाय यासदर्भात आपण उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असून याशिवाय मुख्यमंत्री, महसूलमंत्री व कृषीमंत्री यांची भेट घेऊन यादर्भात निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.या धडक मोर्च्याकरिता शिवसेना उपजिल्हा प्रमुख हनुमान धांडे, अशोकराव बरडे , कुमार रुपवते, रामशेठ लांडे, दिनेश काकडे, पंडित गावडे, अशोक खापे, अर्जुनराव नखाते, जगन दुर्गे, लक्ष्मण काकडे, शाहू वाघ, बंडू पागिरे , अमोल टोपे, शाम राठोड, सतीश धुपे, मुकुंद हुसे, सीताराम धुळे, गजानन सानप, कल्याण टकले, भाऊसाहेब तांबे, कृष्णा टोंपे, सचिन शेरे, शाम तिकांडे , उद्धव उगले, विजय जाधव, बाळासाहेब गावडे, आशाताई काकडे, अशोक गिरी, राजेश डोके आदीसह मोठया संख्येने शिवसैनिक व युवसैनिक उपस्थित होते.

# २० रुपयावरून आता ४० रुपये हाताळणी शुल्कात वाढ

जालना । पतिनिधी

नोंदणी व मुद्रांक विभागास 'बांधा वापरा हस्तांतरण करा' या तत्वावर खाजगीकरणाच्या माध्यमातून संगणकीकरण करणे, संगणकीकरणांतर्गत येणा-या हार्डवेअर, सॉफटवेअर कंझ्युमेबल्स, मनुष्यबळ यांच्या दरात त्याचप्रमाणे स्वीय प्रपंची लेख्यातून खर्च करावयाच्या बार्बीमध्ये वाढ झालेली असल्याने नोंदणी व मुद्रांक विभागातील खाजगीकरणाच्या माध्यमातून येणारा खर्च भागविण्याकरिता दस्त हाताळणी शुल्क रु.२०/- वरुन रु.४०/- इतके निश्चित करण्यारा शासन निर्णय क्रमांक मुद्रांक-२०२५/प्र.क्र.९/म-१ (धोरण), दि. १५ एप्रिल २०२५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. याप्रमाणे 'आय-सरिता' सॉफटवेअरमध्ये आवश्यक ते बदल व त्याची चाचणी करण्याची कार्यवाही एन.आय.सी. कडून दि. १६ एप्रिल २०२५ रोजी करण्यात येईल व सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दि. १७/०४/२०२५ पासून करण्यात आली आहे. याबाबत आपले अधिनस्त दुय्यम निबंधक यांना अवगत करावे. तसेच सह जिल्हा निबंधक यांनी या शासन निर्णयाची माहिती नागरिकांना होण्याकरिता प्रसिद्धी करण्यात येत आहे . आणि नागरिक व दुय्यम निबंधक यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. असे आदेश रविंद्र बिनवडे भा.प्र.से. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांच्यामार्फत कळविण्यात येत आहे.

# उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर



जालना । प्रतिरिधी

अंबड तालुक्यातील जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव चौफुली या ठिकाणी दि१५ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४ या दरम्यान कबड्डीच्या तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिराचे वैशिष्ट्ये अशी : सदरील शिबिर हे निवासी असून फक्त मुलांसाठी असणार आहे,कबड्डीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण, आहार विषयक मार्गदर्शन, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी बौद्धिक सत्राचे आयोजन,किडा मानसशास्त्र ज्ञानाचे आयोजन तसेच या शिबिराला राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षक व राष्ट्रीय पंच यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.या क्रीडा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना मोबाईल व टीव्ही पासून दूर राहण्याची सवय लागणार आहे शिबिराचे उद्घाटन जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किनगाव या शाळेचे संस्थापक अध्यक्ष बालासाहेब इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कैलास मुके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोद जाधव, महेश रायकर, दत्ता शिराळे, उद्योजक अविनाश शिंदे आणि रोहिलागडचे सरपंच शामसुंदर पाटील हे होते.

## पान १ वरून...

### राज्यात ६५ नव्या कृषि

अधिनियम १९६३ नुसार ३०५ कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. तसेच या बाजार समित्यांच्या आवारात ६२५ उपबाजार कार्यरत आहेत. मात्र राज्यातील ६८ तालुक्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती नाहीत. त्यामुळे ६८ पैकी ६५ तालुक्यात बाजार समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ नुसार कृषी उत्पन्नाची व्याख्या करण्यात आली आहे. यामध्ये कृषी कृषी, फलोत्पादन, पशुधन, मधुमक्षिकापालन, मत्स्यसंवर्धन, मत्स्यव्यवसाय आणि वन उत्पन्नाची तरतुद करण्यात आलेली आहे. राज्यातील एकूण ६८ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही. यामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला, अंधेरी आणि बोरिवली या शहरी भागातील तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे या तिन्ही ठिकाणी बाजारसमिती स्थापन करणे, व्यावहारिकदृष्ट्या संयुक्तिक नाही, असेही राज्य सरकारने शासन निर्णयात सांगितले आहे. तसेच जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करण्यात आले आहे. त्यातून बदनापूर कृषी उत्पन्न बाजार समिती तयार झाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बाजार समिती योजनेतून संबंधित तालुका वगळण्यात आल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

--------------

### भाजपाने महाराष्ट्रात गाठला

सदस्य नोंदणीचे विक्रमी उद्दिष्ट साध्य केल्याबद्दल प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पक्ष कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. यावेळी खासदार अरूण सिंह म्हणाले की, पक्षाच्या ७० टक्के बुथ समित्यांचे गठन झाले असून २२ एप्रिलपर्यंत १ लाखा पर्यंत बूथ समित्या गठन करण्याचे उद्दिष्ट आहे. पक्षाच्या रचनेनुसार एका बुथमध्ये १२ सदस्य असतात म्हणजेच १२ लाख सक्रीय कार्यकर्त्यांची फौज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी कार्य करेल. संघटन सर्वोपरि या विचारधारेने कार्य करणाऱ्या भारतीय जनता पार्टीमध्ये अंतर्गत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. संघटनशक्तीला बळ देण्यासाठी पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी झोकून देऊन काम करत असल्याबद्दल कौतुक केले. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार उत्तमपणे काम करीत असल्याचे प्रशस्तीपत्रकही यावेळी देऊन टाकले. खा. सिंह यांनी नमूद केले.

------------

### धनंजय मुंडेंच्या आमदारकीविरुद्ध

म्हटले. तसेच, एकट्या रंजीत कासलेला १० लाख दिले असतील तर बाकीच्यांना किती दिले, असा सवालही देशमुख यांनी विचारला आहे. रंजीत कासले यांना धनंजय मुंडे यांनी ईव्हीएमपासून दूर जाण्यासाठी दहा लाख रुपये दिल्याचे कासले यांनी म्हटले होते. त्यावर परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी परळी मतदारसंघात कशा पद्धतीने प्रशासनाचा गैरवापर झाला, याची स्पष्टता दिली आहे. एकट्या कासलेला दहा लाख रुपये दिले तर इतरांना किती रुपये वाटले? असतील असा सवाल करत परळी विधानसभा मतदारसंघात प्रशासनाचा कशा रितीने गैरवापर झाला हे समोर येत अल्याचे राजेसाहेब देशमुख यांनी म्हटले. आता या सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात जाणार असल्याचे देखील देशमुख यांनी सांगितले. परळी मतदारसंघात विधानसभा निवडणुकीनिमित्त धनंजय मुंडे आणि राजेसाहेब देशमुख एकमेकांविरोधात उभे ठाकले होते. मात्र, या निवडणुकीत शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. आता, कासले यांच्या आरोपानंतर देशमुख पुढे आले असून, या प्रकरणाच्या चौकशीसाठी ते न्यायालयात धाव घेणार आहेत. तर, यापूर्वीच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंच्या निवडीविरुद्ध न्यायालयात दाद मागितली आहे.

------------

### बिहार विधानसभा निवडणूकीत

नवी दिल्ली येथे १६ एप्रिल रोजी काँगेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे व राहूल गांधी यांच्याशी तेजस्वी यादव यांची भेट झाली यानंतर दोन दिवसातच इंडिया आघाडीची बैठक झाली. यामध्ये तेजस्वी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. बिहार काँगेसचे प्रभारी कृष्णा अल्लावरु यांनी संयुक्त पत्रकारपरिषदेत ही घोषणा केली.

-----------

### आता अपघातग्रस्तांवर एक

निर्णयदेखील यावेळी घेण्यात आला. रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, संस्थांनी दक्षता बाळगावी. गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

**कर्करोग संशयितांच्या नोंदी ठेवा**

कर्करोग संशयित, निदान झालेल्या व उपचारासाठी दाखल रुग्णांची तपशीलवार यादी ठेवावी. त्यांच्या दररोजच्या तपासण्यांची माहिती अचूकपणे भरावी. जिल्हास्तरावर अधिकारी व उपसंचालक यांनी अधिनस्त संस्थांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, असे निर्देशदेखील आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

--------------

### कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी

शासन शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये उपयोग करण्यावर भर देत आहे. महाराष्ट्र शासनाने देखील हे धोरण अवलंबले आहे. या कार्यशाळेत २३ हून अधिक संस्था व ३५ हून अधिक तज्ज्ञ सहभागी झाले होते. यात मोठ्या व मध्यम उद्योगसमूहांचे प्रतिनिधी, स्टार्टअप्स, बहुराष्ट्रीय संस्था आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश होता. या कार्यशाळेचा उद्देश म्हणजे राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल चर्चा करण्यात आली. मुख्यत्वे डेटा गुणवत्ता, डेटा देवाण-घेवाण यंत्रणा, स्थानिक पातळीवर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे, शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन व डेटा मॉनिटायजेशन, स्टार्टअपसाठी सक्षम परिसंस्थेची निर्मिती आदी मुद्द्यांवर चर्चा झाली. धोरण मसुद्यात शेतकऱ्यांना समग्र विचाराअंती प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम धोरणात्मक चौकट तयार करणे, उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात घट, व वास्तविक वेळेतील डेटावर आधारित निर्णयक्षमतेस मदत करणे यावर भर देण्यात यावा याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी पोक्रा प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड,जागतिक बँकेचे प्रतिनिधी व्ही. कानुंगो, रंजन समंत्राय आणि जागतिक बँक गटाचे अरुण शर्मा.,फाय्लो कंपनीचे सुधांशु राय, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार कडून कविता भाटिया, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे जे. सत्यनारायण आणि भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्थेचे एस. एन. त्रिपाठी, सह्याद्री फार्म्सचे विलास शिंदे, वाधवानी फाउंडेशनचे परितोष आनंद आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनच्या निधी नाथ श्रीनिवास, सिडवर्क्सचे राजा वडलमणी, फ्लिपकार्टचे डिप्पी वांकानी, टाफेचे पुलकित मित्तल तसेच बायरचे आनंद श्रीकर, टेक्नो सर्वचे कृष्णन हरिहरन, ग्रो इंडिगोचे परिन तुराखिया, महिंद्रा अँड महिंद्राचे करमयोग सिंग व सुमित दारफळे, नॅसकॉमचे एम. चोकलिंगम, सॅटसुरेचे प्रखर राठी आणि इनोसापियन ॲग्रो टेक्नॉलॉजीजचे सारंग नेरकर उपस्थित होते. या बैठकीत कृषी व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यावर विशेष भर देण्यात आला.

**एआयच्या मदतीने महाराष्ट्रात कृषी विकास**

या नव्या धोरणाद्वारे विविध डेटासेट्सचे एकत्रीकरण, शाश्वत व लवचिक शेती पद्धतींचा प्रचार, पुरवठा साखळी कार्यक्षमतेत सुधारणा, संशोधन व नवोपक्रमांना चालना, वित्तीय समावेश आणि क्षमतेचा विकास हे सर्व उद्दिष्ट आहेत. कार्यशाळेत डेटा सुरक्षेचे महत्त्व, डेटा गुणवत्ता व जोखमीचे व्यवस्थापन अशा मूलभूत बाबींवरही चर्चा झाली. एआयच्या मदतीने महाराष्ट्रातील कृषी विकास व शाश्वतता सुनिश्चित करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

------------

### घाटशीळ पारगाव येथे मुख्यमंत्री

सप्ताह सांगतेला येणार आहेत. त्यांच्यासोबत राज्याच्या पर्यावरण व वातावरण बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे ही येणार असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच शिरूर कासार तालुक्यात येणार असल्याने तालुक्यामध्ये आल्यानंतर भाविक भक्तांची काय संवाद साधतात याची उत्सुकता जनतेला लागलेली आहे. तर इकडे मुख्यमंत्री येणार म्हणून सप्ताहाच्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी घाटशिळ पारगाव येथे जोरदार तयारी चालू असल्याचे बोलले जात आहे.

**मंत्री पंकजा मुंडे व आ. सुरेश धस एका व्यासपीठावर?**

राज्याच्या पर्यावरण व हवामान तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे ह्या मुख्यमंत्र्याच्या दौऱ्यामध्ये घाटशीळ पारगाव येथील सप्ताह सांगतेला येणार आहेत. येथील यजमान आमदार सुरेश धस हेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी उत्सुक असणार आहेत पंकजा मुंडे व सुरेश धस या दोन दिग्गज नेत्यांमध्ये गेल्या काही महिन्यापासून राजकीय वैर निर्माण झाला आहे. उद्या घाटशीळ पारगाव येथील सप्ताह सांगते च्या निमित्ताने ही भाजपची दोन्ही नेते मुख्यमंत्र्यासमवेत एका व्यासपीठावर येतील का? आणि बीड जिल्ह्यातील जनतेला काय संदेश देतील याची राजकीय वर्तुळामध्ये चर्चा रंगत आहे.

-------

### बनकरंजा येथील दलित वस्तीच्या

येत आहे पैसे शिल्लक राहावेत म्हणून नालिकाम न करता पोल सह एलईडी बसवण्याचे काम ग्रामपंचायत गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगणमताने झालेले आहे या शासनाच्या निधीचा योग्य वापर व्हायला पाहिजे मात्र काही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचा निधी जनतेच्या उपयोगी न येता स्वतःचे घर भरण्यासाठी या निधीचा उपयोग केला जात असल्याचं बनकरंजा येथील साठे नगर व बौद्ध नगर या भागातील कामावरून दिसून येत आहे याकरिता अधिकारी व गुत्तेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ते कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. बनकरंजा येथे दलित वस्ती अंतर्गत साठे नगर व बौद्ध नगर येथे बोगस झालेल्या कामाच्या संदर्भात केज पंचायत समिती बिडिओ समृद्धी दिवाने - काळे मॅडम यांना चौकशी करण्यासाठी फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

cmyk

## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त पाटोदा येथे गुरुचरित्र पारायण सोहळा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील.श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रा च्या वतीने. सेवेकाऱ्यांना व दत्त भक्तांना केंद्राच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे की. परमपूज्य गुरुमाऊली. श्री अण्णासाहेब मोरे. प्रदान केंद्र नाशिक दिंडोरी यांच्या आशीर्वादाने श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नाम जप यज्ञ सप्ताह दिनांक.२०/०४/२०२५ ते २६/०४/२०२५ या कालावधीत सप्ताह होणार आहे. सप्ताह काळात गुरुचरित्र पारायण. व स्वामी चरित्र पारायण अखंड प्रहरी. श्री गणेश याग. मनोबोध याग. चंडीयाग मनोबोध याग. स्वामी याग. गीताई याद रुद्र मल्हारी याग. श्री नवनाथ भक्तिसार सुलभ भागवत. श्रीपाद वल्लभ चरित्र. दररोज दुपारच्या वेळी सामूहिक श्री स्वामी चरित्र श्री दुर्गा सप्तशती रुद्र पठाण. श्री स्वामी समर्थ अखंड नामस्मरण सांस्कृतिक कार्यक्रम. दररोज सायंकाळी सहा वाजता. औदुंबर प्रदक्षिणा. ६:३० वा आरती व दिनांक २६ रोजी श्री सत्यदत्त पूजन . बली पूर्णाहुती सकाळी साडेदहा वाजता . महा नैवेद्य आरती सांगता होणार आहे. या सप्ताह कालावधीत. प्रश्न उत्तरे . ग्राम अभियान प्रशिक्षण. संपूर्ण होणार असून गुरुचरित्र पारायण सेवेसाठी तसेच सप्ताह कालावधीत होणाऱ्या सर्व अध्यात्मिक सेवेसाठी पाटोदा शहरातील व तालुक्यातील. सर्व. साप्ताहिक व दैनिक सेवा केंद्र सेवेकरी भाविक भक्त नागरिक यांनी या सेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन पाटोदा सेवा केंद्र तर्फे करण्यात आले आहे ठिकाण श्री संत नरहरी महाराज मंदिर रस्ता गल्ली पाटोदा



# सनगावच्या सरपंचासह १० साथीदाराची गावातील महिला वकिलास मारहाण, तालुक्यात खळबळ

**आंबजोगाई । प्रतिनिधी**

**ध्वनी प्रदूषणा मूळे आवाज कमी करावा या मागणीची तक्रार केल्याच्या कारणास्तव संतापलेल्या गावच्या सरपंचासह १० साथीदाराने आपल्याच गावातील महिला वकिलास बेदम मारहाण केल्याची घटना आंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे घडली.**

या विषयी प्राप्त माहिती अशी कि, अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयात वकीली करणाऱ्या व तालुक्यातील सनगाव येथील राहिवासी ऍड ज्ञानेश्वरी श्रीधर अंजान या महिला वकीलाने सनगाव गावात ध्वनिप्रदूषणामुळे मायग्रेनचा त्रास होत असल्याने आवाज कमी करावा, लाऊडस्पीकर लाऊ नयेत घरापुढील पिठाच्या गिरण्या काढाव्यात याबाबत कार्यालयीन तक्रारी दिल्या होत्या, याचा राग मनात धरून याच गावचे सरपंच अंजान आणि त्याच्या १० कार्यकर्त्यांनी

ज्ञानेश्वरी ही तिचे अंबराईचे शेतात कै-या अनण्यासाठी जात असतांना आद्रकिचे शेतातील बांधचे जवळ गेली असता यातील आरोपी क्र. एक ते सहा यांनी त्याचे हातात काळ्या रबरी पाईप घेवुन व आरोपी क्र. सात ते नऊ हे हातात लाकडी काठ्या घेवुन तिच्या जवळ आले व तु या पुर्वी गावातील पिठाच्या गिरण्या व मंदिरावरिल भौग्याच्या तक्रारी का दिल्यास व तुझे आईची कोर्टात सुरु असलेली ३०७ ची केस का काढून घेत नाहीस व तु यापुढे आमचे विरुध्द तक्रार देशिल का असे म्हणुन त्याचे हातातील काठ्या व रबरी पाईपने फिर्यादीचे पाठीवर, मानेवर कमरेवर दोन्ही पायाचे पाठीमागील पायावर, शिटवर मारहान करून गंभिर दुखापत केली. व आरोपी क्र. एक व तीन याने वाईट हेतुने तिच्या हाताला धरुन अंगास झोबाझोब करुन विनयभंग केला. आरोपी क्र. दहा याने तिला खलास करुन टाका असे म्हणुन आर्वाच भाषेत शिविगाळे केली तसेच



तिचे चुलते योगीराज अंजान व चुलती अर्चना अंजान याना ही मारहान झाल्याचे वृत्त आहे. या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आसुन सरपंच आणि इतर दहा पुरूषांनी मिळुन एका वकील असलेल्या स्त्रीला मारहाण करणं कितपत योग्य आहे ? हा पुरुषार्थ आहे का ? या घटनेने सरपंचाच्या कारभारा विषयी प्रश्न चिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणी युसूफ वडगाव पोलिसात अनंत रघुनाथ अंजान, २) सुधाकर रघुनाथ अंजान, ३) राजकुमार ज्ञानोबा मुंडे, ४) कृष्णा ज्ञानोबा मुंडे, ५) ज्ञानोबा बब्रुवान रपकाळ, ६) नवनाथ ज्ञानोबा जाधव ७) मृत्युजय पांडुरंग अंजान ८) अंकुश बाबुराव अंजान ९) सुधीर राजाभाऊ मुंडे, १०) नवनाथ दगडु मोरे सर्व रा. सनगाव ता. अंबाजोगाई जि. बीड या १० जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सफौ ५९० सय्यद हे करत आहेत. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्यांनी सत्यभामा सौंदर्मल यांनी या प्रकरणी समाज माध्यमावर पोस्ट केल्या नंतर या प्रकरणाला वाचा फुटली आहे.

## प्रा.धम्मानंद बोराडे यांचा एमपीएससी उत्तीर्ण झाल्याने यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने सत्कार



**माजलगाव । प्रतिनिधी**

**सावरगाव येथील सुपुत्र आणि फुले, शाहू, आंबेडकरी विषयाचे अभ्यासक प्रा. धम्मानंद बोराडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत औद्योगिक न्यायालयात कार्यकारी सहाय्यक (क्लार्क) पदावर निवड झाली. त्यांचा गौरव यशोधरा बुद्धविहार ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

शिक्षण क्षेत्रात योगदान देणारे बोराडे - व . असूनही अनेक वर्षे सुंदरराव सोळंके महाविद्यालय व सिद्धेश्वर महाविद्यालय येथे तासिका तत्वावर कार्यरत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लिंबाजी वाघमारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर साळवे, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक कांबळे, शिवाजी ससाणे, पत्रकार रविकांत उघडे, सुभाष बोराडे, सिद्धार्थ पौळ, विशाल जावळे ,आदित्य जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले. प्रभाकर साळवे, प्रा.सुदर्शन स्वामी, राजकुमार सोनवणे सर यांनी मनोगत व्यक्त करताना बोराडे सरांचे यश हे जिद्द, संघर्ष व निष्ठेचे प्रतीक असल्याचे नमूद केले. प्रा. बोराडे यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या संघर्षमय प्रवासाची मांडणी केली, ते म्हणाले की बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर असल्याने आणि वाचनाची गोडी असल्यामुळेच हे यश शक्य झाले तसेच या प्रवासात प्राथमिक ते पदव्युत्तर मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचे, कुटुंबाचे, मित्रपरिवाराचे मी विशेष आभार मानतो असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवाजी ससाणे यांनी केले.

## पार्वतीबाई फपाळ यांचे दुःखद निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील आलापुर येथील रहिवासी असलेल्या पार्वतीबाई त्रिंबकराव फपाळ वय १०१ वर्षे यांचे वृद्धापकाळाने आज दि. १८ एप्रिल २०२५ रोजी निधन झाले.



पार्वतीबाई या अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने सर्व परिचित होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर आलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात भागवताचार्य परमेश्वर महाराज फपाळ, प्रल्हाद फपाळ, सुना, नातवंडे, पतवांडे असा परिवार आहे. ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांच्या आई व बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ साहेब यांच्या आजी होत.

## खरीप हंगाम २०२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२५ची पूर्वतयारी व नियोजनाकरिता जिल्हा अंतर्गत कृषी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची एकदिवसीय कार्यशाळा बुधवार दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी बीड येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेस विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक कृषी अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक माधुरी सोनवणे छत्रपती संभाजी नगर, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी बीड, एस. एम. साळवे, नोडल अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक पल्लवी जगताप, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण बीड, डी.व्ही. जाधवर, कृषी उपसंचालक एस एस सय्यद, कृषी विकास अधिकारी बीड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी येणाऱ्या आगामी खरीप हंगाम २०२५ ची पूर्वतयारी व नियोजना बाबत क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या विविध मोहिमा यामध्ये माती परिक्षण मोहिम, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी मोहीम, बीज प्रक्रिया मोहिम, हुमणी किड निमंत्रण मोहीम, खरीप पिकाच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण मोहीम, कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम, आपत्कालीन पीक नियोजन कार्यशाळा प्रशिक्षण सत्रे इत्यादी करिता दिलेल्या वीत वेळ वेळापत्रकानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत पी.आर. देशमुख विभागीय कृषी सहसंचालक यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले.

आगामी खरीप हंगामाकरिता खते, बियाणे व आवश्यक निविष्ठा यांचे मान्सून आगमनाच्या पूर्वीच तालुका न्याय पुरवठा नियोजन तसेच त्यांच्या गुणवत्ता नियंत्रणाच्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक, मंडळ कृषी अधिकारी, कार्यालय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच सर्व तंत्र अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध शेतकरी गटाच्या तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक डी.व्ही. जाधवर यांनी केले.

## चिंचाळा येथील अंगणवाडीमध्ये पालक मेळावा

वडवणी । प्रतिनिधी

चिंचाळा येथे मंगळवारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प वडवणी यांच्यावतीने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते .या पालक मेळाव्याला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रकल्प वडवणी योजनेच्या सीडीपीओ मेत्रे मॅडम उपस्थित होत्या व परिवेक्षिका राऊत मॅडम, मस्के मॅडम व भंडारी मॅडम या ही उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचळा गावच्या सरपंच नीता सुभाष आजबे होत्या.मीनाक्षी मुंडे याही उपस्थित होत्या या कार्यक्रमांमध्ये बालकांचा बौद्धिक मानसिक शारीरिक व सर्वांगीण विकास याबद्दल उपस्थित पालकांना मार्गदर्शन करण्यात आले यावेळी



विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वस्तूंचे रंगांचे, वेगवेगळ्या चवीचे, ज्ञान होण्यासाठी तसेच स्पर्श ज्ञान होण्यासाठी प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. या प्रदर्शनाचा लाभ पालकांनी घेतला सदरील कार्यक्रमासाठी कुप्पा विभागाच्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका धिरे रसिका, शिरसट विद्या, गिरी महानंदा, ज्योती भारती जनाबाई शिरसाट, सुनिता काटे, सुनिता पायके यांनी परिश्रम घेतले.यावेळी पालकांना भोजनही देण्यात आले.

पान ६ वरून...

### राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र

निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण मुद्यांवर चर्चा केली जाणार असून, पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षाचे सर्व मार्गदर्शक नेतेमंडळी आढावा घेणार आहेत. या बैठकीस परळी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह उत्तम दादा माने, मिनिनाथ दादा फड, देवराव महाराज लुगडे, बाबासाहेब शिंदे, जीवनराव देशमुख, एच.यू.फड, शंकर शेजुळ, वर्षाताई रायभोळे, कल्पनाताई देशमुख, रमेश ढाकणे, सोमनाथ भोसले, फिरोज सय्यद, कल्पनाताई देशमुख, मंगलताई सोळंके, अश्विनीताई सोळंके, दीपाली सावंत, अश्विनी सरवदे, एकनाथ मुंडे, डॉ.जे.एन.शेख, गणेश देवकते, भीमराव हाके, प्रकाश राठोड, राजेश फड, शिवाजीराव नागरगोजे, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, गोपाळराव सलगर, प्रकाश मुंडे, पप्पू गित्ते, समाधान मुंडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

### शॉर्टसर्किटमुळे शेडनेटला

शेतकऱ्यापुढे एक नवा आदर्श निर्माण केला होता. या शेडनेट ग्रहाच्या लगतच काही अंतरावरून विद्युत वितरणाची विद्युत वहिनी तारा गेलेल्या आहेत. या तारे वरती शॉर्टसर्किट होऊन शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या दरम्यान आगीच्या ठिणग्या जमिनीवरती पडल्या आणि वाळलेल्या गवताने पेट घेतला. इथूनच काही पावलांच्या अंतरावर बळीराम उगले या शेतकऱ्यांची शेडनेट होते. या शेडनेटला अगदी काही वेळातच आग लागली आणि पाहता पाहता शेडनेट ग्रह अगदी जळून खाक झाले. शेडनेटमध्ये अंथरलेले ठिबकचे पाईप, पिकांना फवारणी करण्यासाठी लागणारे स्पिंकलर, विद्युत मोटार पाईप, यासाठी लागणाऱ्या महागड्या पाण्याच्या टाक्या जळून खाक झाल्या आहेत सुमारे या आगीमध्ये तीस लाखाच्या वर नुकसान झाल्याची माहिती शेतकरी बळीराम मारुती उगले यांनी दैनिक राज्य लोकतंत्र ला देताना सांगितले आहे.

पंचनाम्यासाठी दिरंगाई

बळीराम मारुती उगले या शेतकऱ्यांचे शॉर्टसर्किटमुळे सुमारे ३० लाखाचे नुकसान झाले. शेडनेटला लागलेल्या आगीमुळे झालेल्या शेतकऱ्याच्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी तहसील कार्यालय, कृषी कार्यालय, विद्युत वितरण कंपनी या सर्वांना माहिती देऊनही केवळ लाईनमन भोसले व कृषी सहाय्यक हनुमान सानप यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली मात्र झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अद्याप वेळ मिळाला नाही. तर तलाठी महोदय मी बाहेरगावी असल्याचे सांगून वेळ मारून नेत असल्याचा आरोप शेतकरी बळीराम उगले यांनी केला आहे.

### सोमेश्वरमध्ये श्रवणीय

केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे देण्यात आली. अभिवादन सभेचे सुत्रसंचलन, मनोगत व आभार डी.यु.चामे सर तर प्रस्ताविक श्रीमती व्ही.बी.तेलंग मॅडम यांनी केले. याप्रसंगी पत्रकार विश्वजित गंडले, पालक जगन्नाथ लामतुरे, केरबा गोडबोले, माध्य व उच्च माध्यमिकचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## गांधी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण व माजी विद्यार्थी स्नेह मेळावा

कडा । प्रतिनिधी

येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण व माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. कांतीलालजी चानोदिया होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. नवनाथ पडोळे सर, सामाजिक कार्यकर्ते श्री. अभिजीत लुनिया, बी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गफार सय्यद सर, माजी विद्यार्थी प्रतिनिधी श्री. रामप्रसाद देशमुख, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख श्री धनंजय कोकणे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहर भंडारी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक प. पू. श्री. अमोलक ऋषीजी म. सा. व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून तसेच विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी करताना संस्थेमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रम, त्याचप्रमाणे संशोधन केंद्राबद्दल विद्यार्थ्यांना अवगत केले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा



दिल्या.

सामाजिक कार्यकर्ते श्री अभिजीत लुनिया यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या शताब्दी महोत्सवाबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच विद्यार्थ्यांना केवळ पदवी व पदव्युत्तर शिक्षणापुरतेच मर्यादित न राहता कौशल्य विकास साधून आर्थिक प्रगती साधण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

माजी विद्यार्थी प्रतिनिधी श्री. रामप्रसाद देशमुख यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सहभागी करून घेतल्याबद्दल संस्थेचे आभार मानले.बी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गफार सय्यद यांनी विद्यार्थ्यांना संभाषण कौशल्य विकसित करण्यावर भर देण्याचे सांगून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. श्री नवनाथ पडोळे सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वाय. बी. रसाळ यांनी व आभारप्रदर्शन डॉ.अमोल कल्याणकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दिव्यांग शाळेतील शंभरावर कर्मचाऱ्यांचे वेतन बंद

**जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्याचे आदेश; जिल्ह्यात आणखी एखादा 'धनंजय नागरगोजे' होण्याची वाट पहायची का?**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा मागील काही महिन्यांपासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विविध कारणांनी चर्चेत आहे.खून,मारामाऱ्या,शासकीय योजनेतील घोटाळे आणि शेतकरी व कर्मचारी आत्महत्या या घटनानी संपूर्ण बीडच नाहीतर महाराष्ट्र हादरून गेलेला आहे.महिन्यापूर्वीच एका आश्रम शाळेतील 'नागरगोजे' नामक कर्मचाऱ्याने पगार देत नसल्याने फाशी घेऊन आत्महत्या केली,हीच वेळ आता अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे दिव्यांग शाळेतील शंभरावर कर्मचाऱ्यांवर येऊन ठेपली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण कार्यालय अंतर्गत चालणाऱ्या ५० च्या आसपास दिव्यांग मुलांच्या शाळा कार्यरत आहेत.या शाळेमध्ये विविध दिव्यांगत्व असणारी मुले हि निवासी स्वरूपाचे शिक्षण घेत आहेत.या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांना जिल्हा समाजकल्याण कार्यालय यांच्या मार्फत वेतन दिले जाते.या दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य या शाळा आणि या शाळेतील कर्मचारी करत असतात.या शाळांनी कला,क्रीडा व शैक्षणिक विभागात आपला ठसा जिल्हा व राज्यस्तरावर उमटवला आहे.या विद्यार्थ्यांचे साधे कौतुकही या कार्यालयाकडून करण्यात आलेले नाही,सध्या या जिल्हा समाजकल्याण कार्यालयाची अवस्था पाहता संपूर्ण प्रभारी राज असल्याचे आपल्याला पहावयास मिळत आहे.संबंधित विभागाचा फक्त एखाद दुसरा कर्मचारी या ठिकाणी आहे नसता फक्त प्रभारी राजच. मागील काही आठवड्यापूर्वी प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी आणि प्रभारी वै.सा.का.म्हणून कार्यरत असणारे नखाते यांनी जिल्ह्यातील काही शाळांना भेटी दिल्या आणि या भेटीमध्ये जाणीवपूर्वक काहीतरी भौतिक सुविधेबाबत त्रुटी काढून माहे मार्च २०२५ पासून शंभराच्या वर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते बंद करण्याचे आदेश दिले.सदरील शाळांनी पुराव्यानिशी खुलासा देऊनही तो अमान्य असल्याचे पत्रच या शाळांना देण्यात आले,यामुळे सदरील शाळेतील कर्मचारी हे वैतागले असून विनाकारण पगार बंद केल्याने त्यांचे कर्जाचे हप्ते,एल.आय.सी.चे हप्ते,आपल्या मुलांची शैक्षणिक फीस,काहींचे तर इन्कम टॅक्स हि भरणे बाकी असल्याने तो कसे भरावी तसेच काही कर्मचाऱ्यांच्या घरी लाग्नसामारोह असल्याने कर्मचारी चिंतेत आहेत. या दिव्यांग शाळेतील कर्मचारी अशा मनमानीला कंटाळले आहेत.वेतनच अनिश्चित कालावधीसाठी बंद केल्याने आता पुढे करायचे काय? या विवंचनेतून एखाद्या कर्मचाऱ्याने आत्महत्या सारखे पाऊल उचलल्यास त्यास जबाबदार कोण ? असा सवाल हे कर्मचारी करताना दिसून येत आहेत.तरी मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन तो सोडवण्याचा प्रयत्न करावा असे बोलले जात आहे.

### दिव्यांग विभागात 'न' खाते प्रभारी राज

जि.प.च्या दिव्यांग विभागात सध्या जिल्हा समाजकल्याण अधिकारी ते त्याखालील बहुतांश कर्मचारी हे प्रभारी नियुक्ती वर असल्याचे व काही कर्मचारी तर बंद पडलेल्या शाळेतील व काही कर्मचारी हे विद्यार्थीच नसलेल्या शाळेतील असल्याचे समजते.हेच लोक मागील चार पाच वर्षापासून इथेच ठाण मांडून आहेत.प्रभारी असलेले वैसाका आणि समाजकल्याण अधिकारी यांनी यांचीच एक टिम तयार करून जिल्ह्यातील कारभार चालवला आहे हे कळण्या पलीकडचे आहे.

शाळेमधील भौतिक सुविधेच्या अभावामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन रोखणे योग्य आहे का?त्यासाठी शाळेतील कर्मचारी दोषी कसा? याला जबाबदार कोण ? कर्मचाऱ्यांचे या कारणास्तव वेतन बंद करावे हे कुठल्या दिव्यांग संहितेमध्ये आहे असा सवाल दिव्यांग शाळेतील कर्मचारी करताना दिसून येत आहेत.लवकरच संघटनेच्या माध्यमातून लढा उभारणार असल्याचे समजते आहे.

cmyk




# पुण्यात होणार देशातील पहिले 'कृषी हॅकेथॉन'

## शासनाच्या पुढाकारातून १ ते २५ जून दरम्यान होणार आयोजन

पुणे : कृषी क्षेत्रात नावीन्य आणि तंत्रज्ञानाच्या आधारे परिवर्तन घडवण्यासाठी राज्यातील, देशातील नव उद्योजकांच्या सहकार्याने भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय 'कृषी हॅकेथॉन २०२५' आयोजित करण्यात येणार आहे. हे हॅकेथॉन शासनाच्यावतीने एक ते तीन जून या कालावधीत पुणे येथे घेण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे देशातील कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाधिष्ठित नवोपक्रमांना चालना मिळणार असून, आधुनिक व तांत्रिक उपाय शोधण्यात एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

महाराष्ट्र शासनांतर्गत असलेल्या कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि पुणे कृषी महाविद्यालय यांचे सहकार्य लाभले आहे. 'अॅग्री हॅकेथॉन २०२५' हा कृषी क्षेत्रातील नवप्रवर्तन, संवाद आणि सहकार्याला चालना देणारा देशातील सर्वांत मोठा मंच ठरणार आहे. देशभरातील तरुण तंत्रज्ञ, स्टार्टअप्स, उद्योग क्षेत्रातील नेते, शासकीय अधिकारी एकत्र येऊन भारतीय कृषी क्षेत्रातील प्रमुखसमस्यांवर वेगवान, प्रभावी व खर्चिकदृष्ट्या योग्य उपाय शोधतील. या हॅकेथॉनमध्येविद्यार्थी, नवप्रवर्तक, स्टार्टअप्स आणिसंशोधक विविध स्तरांवर सहभागी होऊ शकतात. आंतरशाखीय सहकार्य, संशोधन व तंत्रज्ञानाच्या आधारे प्रत्यक्षात अमलात आणता येणार आहे.




कृषी क्षेत्रातील विविध समस्यांचे आठ प्रकारांत वर्गीकरण करण्यात आले असून, त्यावर स्पर्धकांनी उपाययोजना (सोल्यूशन) शोधायचे आहे. सर्वोत्तम सोल्यूशन सादर करणाऱ्या स्पर्धकांची प्रत्येक गटामध्ये प्रथम व द्वितीय पारितोषिकासाठी तज्ज्ञ समितीमार्फत निवड करण्यात येणार आहे. प्रथम विजेत्यास २५ लाख रुपये (प्रत्येक क्षेत्रातील आठ विजेते) व द्वितीय विजेत्यास १५ लाख रुपये (प्रत्येक क्षेत्रातील आठ उपविजेते) पारितोषिक म्हणून दिले जाईल. राज्यातील स्पर्धकांकडून आलेल्या उपाययोजना व सोल्यूशन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याचे उत्पादन व विपणन प्रोत्साहन म्हणून हे पारितोषिक, निधी व मार्गदर्शनाच्या संधीही दिल्या जातील.

या हॅकेथॉनला नेचर ग्रोथ (इस्राईल) व नेदरलँड्सच्या दूतावासातील कृषी विभाग या आंतरराष्ट्रीय भागीदारांचा पाठिंबा आहे. तसेच बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, आयसीएईआर, कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि नाबार्ड (राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक) या राष्ट्रीय संस्थाही सहभागी आहेत.


### नोंदणीसाठी अर्ज सुरू

अॅग्री टेक नवप्रवर्तकांनी या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. स्पर्धकांना https://www. puneagrihackathon. com या संकेतस्थळावर ५ मेपर्यंत अर्ज करता येतील. आलेल्या अर्जांची पडताळणी करून स्पर्धकांची यादी १५ मेपर्यंत अंतिम करण्यात येईल.

### या विषयावर उपाययोजना शोधणार

कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय). जलसंधारण व मृद् व्यवस्थापन कृषी यांत्रिकीकरण. पीक संरक्षण (खते व कीटकनाशके). कृषीसाठी अक्षय ऊर्जा. कापणीपश्चात तंत्रज्ञान व कचरा व्यवस्थापन. कृषी अर्थशास्त्र व पुरवठा साखळी. इतर नावीन्यपूर्ण अॅग्री टेक संकल्पना (एआय वगळून).

# अशी फुलवा परसबाग



घरालगत असलेल्या मोकळ्या जागेवर आणि सांडपाण्यावर आधारित उपयुक्त भाजीपाल्यांची बाग म्हणजे परसबाग होय. आपल्या घराभोवती, अंगणात, परसात, बाल्कनीमध्ये, टेरेसवर, जागा असेल तिथे वृक्षलागवड करून, बाग फुलवून आपण पर्यावरण संवर्धनामध्ये आपले योगदान देऊ शकतो.

परसबागेचे उपयोग :पौष्टिक मूल्यांची भरपूर ताजी फळे आणि भाज्यांचा पुरवठा होतो. आरोग्यदायी आणि चवदार अशा विषारी रसायनांपासून मुक्त अन्नपदार्थांचा पुरवठा होतो. आवश्यक जीवनसत्व आणि खनिजे प्रदान करून रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत होते. सगळ्याच ऋतूंमधील फळे आणि भाज्यांद्वारे आहारातील विविधतेची हमी देते. स्वयंपाकघरातील सांडपाणी आणि कचरा इत्यादी सामग्रीचा प्रभावी वापर होतो.

परसबागेसाठी हे लक्षात ठेवा : पाण्याचा श्रोत उपलब्ध असावा. पाण्याचा योग्य निचरा होणारी जागा निवडावी स्वंपाकघरातील टाकाऊ पाणी वापरले जाऊ शकते. या जागेला दिवसातून किमान ३ ते ४ तास सतत सूर्यप्रकाश मिळायला हवा. पूर्व पश्चिम दिशेने सारी आणि वरंबा बनवून जागा तयार करून घ्यावी. देशी आणि सरळ वाणाचे बियाणे निवडावे. चारही बाजूने सरळ कुंपण करावे.

परसबागेचे प्रकार : परसबागेचे प्रकार हे त्याच्या जागेवरून व माणसांच्या संख्यावर अवलबून असते.

मोठी परसबाग : २० गुंठे ते १ एकर या जागेमध्ये केलेली परसबाग. यामध्ये वड, पिंपळ, औषधी वनस्पती, फळझाडे, फुलझाडे, वेली इत्यादी लागवड केली जाऊ शकतो.

मध्यम परसबाग : ५ गुंठे या जागेमध्ये केलेली परसबाग.

छोटी परसबाग : १.५ ते ५ गुंठे या जागेमध्ये केलेली परसबाग.या मध्ये हंगामी भाजीपाला, फळभाज्या इत्यादी लागवड केली जाऊ शकतो.

गच्ची वरील परसबाग : पॉलिथीन पेपर अंथरून त्यवर माती टाकून तयार केलेली परसबाग.

बागकामासाठी लागणारी अवजारे : खुरप - तण काढण्यासाठी, माती खुरपण्यासाठी कुदळ / टिकाव - जमीन खोदण्यासाठी, फळांचे रोप लावण्यासाठी, खड्डा करण्यासाठी

फावडे - खड्ड्यातील माती काढण्यासाठी किंवा खड्डा भरण्यासाठी, आळे करण्यासाठी, सरी-वरंबे करण्यासाठी. तसेच छाटणीसाठी कटर, पाण्यासाठी झारी, पाइप, कुंड्या, लटकणाऱ्या बास्केट्स , कोयता या सर्व बाबी आवश्यक आहेत.

# रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली : व्यवस्थापन आणि देखभाल

शहरीकरण आणि त्यातील पूर ही काही नवीन संकल्पना नाही. महाराष्ट्रामध्ये सन २००५ मध्ये आलेला पूर, चेन्नई मध्ये २०१५, पुणे व बेंगलोर मध्ये २०१९ ला असे अनेक पुर मोठ्या शहरांमध्ये दिसून येत आहेत. याला कारणीभूत म्हणजे वाढत्या शहरीकरणाबरोबर त्यातील ड्रेनेजची असलेली असुविधा आणि अयोग्य पाणी व्यवस्थापन.

पाऊस पडल्यानंतर पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट योग्य नसेल तर ते रस्त्यावर येऊन साठायला लागतो. हळूहळू मग तो मोठ्या पुराचे रूप धारण करते. नाल्यामध्ये कचरा अडकला तर ते ब्लॉक होते आणि पाण्याला वाहण्यासाठी मार्ग मिळत नाही मग ते रस्त्यावर येऊन साठते.

पावसाचे पाणी असो अथवा रोजच्या वापरातील पाणी असो त्याला एकाच ठिकाणी सोडले जाते ते म्हणजे गटर किंवा ड्रेनेज लाईन. गटारीच्या क्षमतेपेक्षा जास्त पाणी झाल्यानंतर नाला तोडून ते पाणी सपाटभू भागावर व रस्त्यावर येते आणि पसरते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, तसेच रस्ते खराब होतात. पुरामुळे नुसते रस्ते खराब होत नाही तर डेंग्यू चिकनगुनिया, थंडी ताप व मलेरिया या सारखे विविध साथीचे आजार सुद्धा पसरतात.

या सर्वांना आळा घालण्यासाठी एक लक्षवेधी उपाय म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंग. या तंत्रज्ञानामुळे आपल्याला पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करता येते. पावसाचे पाणी वेगवेगळ्या पद्धतीने मार्गाने साठवता येते. अशाच काही पद्धती खालील प्रमाणे,

रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली :या मध्ये छतावर पडणाऱ्या पाण्याला एकत्र करून जमिनीमध्ये भूजल पुनर्भरणासाठी सोडता येते किंवा स्टोरेज टाकीमध्ये साठवून ते पुढील काळासाठी वापरता येऊ शकते. पावसाचे पाणी पुनर्भरण किंवा पुनर्वापर खालील पद्धतीद्वारे करता येते. पावसाच्या पाण्याचे पुनर्भरणी करून भूजल पातळी वाढविण्यात येते तसेच वाहणाऱ्या पाण्याचे नियंत्रण सुद्धा करता येते. शहरी भागात इमारतीचे प्रमाण जास्त असते व छतांना पडणारे पावसाचे पाणी नियोजना अभावी मोठ्या प्रमाणात वाहून जाते त्यामुळे छतावरील पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे छतावरील पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजनाद्वारे खालील गोष्टी साध्य करता येतात. त्यामध्ये प्रामुख्याने,भूजलाचा स्थर नियंत्रित करता येते. शहरात येणाऱ्या पुराच्या पाण्याची तीव्रता व वारंवारिता कमी करण्यासाठी मदत होते. दुष्काळात पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होते. भूजलातील पाण्याची पातळी व गुणवत्ता सुधारता येते. जल प्रदूषण रोखण्यास मदत होते. पाण्याची होत असलेली कमी पूर्ण करता येते. पावसाळ्यात गटार व नाले ब्लॉक होऊन पूर येऊ नये याकरिता.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३३६ : दक्षिणेमध्ये विजयनगर हिंदू राज्याची स्थापना झाली.
१३३६ : हरिहर व बुक्क यांनी विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना केली.
१७०३ : औरंगजेबाने सिंहगड ताब्यात घेतला.
१७२० : शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना कर्हाडनजीक मसूर येथे पेशवाईची वस्त्रे मिळाली.
१८३१ : 'यूनिव्हर्सिटी ऑफ अलाबामा' ची स्थापना झाली.
१८५३ : मुंबईहून ठाण्यापर्यंत नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
१८९८ : जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी
१९१२ : टायटॅनिकमधील वाचलेले ७०५ प्रवासी घेउन आर.एम.एस. कार्पेथिया जहाज न्यूयॉर्कला पोचले.
१९२३ : पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवजयंतीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संगमरवरी अर्धपुतळ्याची स्थापना. हा राज्यातील पहिला शिवपुतळा. या पुतळ्याचे अनावरण मंदिराचे देणगीदार दिवंगत गणेश गोखले यांचे चिरंजीव डॉक्टर महादेव गोखले यांच्या हस्ते करण्यात आले.
१९२४ : सायमन व शूस्टर यांनी पहिले शब्दकोड्यांचे पुस्तक प्रकाशित केले.
१९३० : क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटले.
१९३० : आज काहीही बातमी नाही असे बी. बी. सी. या नभोवाणी केंद्रावरुन सांगण्यात आले.
१९३६ : पेशव्यांची राजधानी असणार्या पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला.
१९५० : आंध्र प्रदेशातील तेलंगणा येथील पोचमपल्ली खेड्यातील ८० एकर जमीनीच्या भूदानाने विनोबा भावे यांची भूदान चळवळ सुरू झाली.
१९५४ : गामल अब्दल नासर याने इजिप्तची सत्ता ताब्यात घेतली.
१९७१ : एअर इंडियाचे पहिले बोईंग ७४७ जंबो जेट विमान 'सम्राट अशोक' शाही दिमाखात सकाळी ८-२० वाजता सांताक्रूझ विमानतळावर दाखल.
२००१ : भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक (- १) वाहकाचे रशियन बनावटीच्या क्रायोजेनिक इंजिनाच्या साहाय्याने श्रीहरिकोटा तळावरून यशस्वी प्रक्षेपण

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७४ : सवाई माधवराव पेशवा यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म (मृत्यू: २७ आक्टोबर १७९५)
१८५८ : महर्षी अण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे स्त्रीशिक्षण व विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक, पद्मभूषण, भारतरत्न (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९६२ मुरुड)
१९०१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी व प्रशासक चंदेश्वर नारायण प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९१० : विश्वनाथ नागेशकर, भारतीय,गोवेकर चित्रकार.
१९१६ : ललिता पवार अभिनेत्री (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९९८)
१९६२ : पूनम धिल्लन अभिनेत्री
१९५८ : माल्कम मार्शल वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९९)
१९९१ : डॉ. वृषाली करी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : क्रांतीवीर तात्या टोपे (रामचंद्र पांडुरंग टोपे).
१९४५ : व्हॅक्यूम ट्यूब चे शोधक जॉन एम्ब्रोस फ्लेमिंग यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १८४९)
१९५५ : अल्बर्ट आइनस्टाइन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९५९ : लोकप्रिय भारतीय क्रांतीकारक व पत्रकार बरिंद्र कुमार घोष यांचे निधन.
१९६६ : योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद यांचे निधन. (जन्म: ३० ऑगस्ट १८८३ डभई, गुजराथ)
१९९५ : पंचांगकर्ते आणि ज्योतिषशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक पंडित धुंडिराजशास्त्री ऊर्फ अण्णा लक्ष्मण दाते यांचे निधन.
१९९९ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघुवीर सिंह यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १९४२ जयपूर)
२००१ : प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि भूगोल आदी विषयातील पार्श्वभूमी असलेले नार्वेशियान लेखक थोर हेयरडाल यांचे निधन.
२००२ : नॉर्वेजियन दर्यावर्दी संशोधक थोर हेअरडल, मानववंशशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९१४)
२००२ : महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष शरद दिघे यांचे निधन.
२००३ : भारतीय 'हिंदी साहित्यिक व साहित्यकार' सुधाकर पाण्डेय यांचे निधन.

# या विषारी वनस्पतीमुळे होते जनावरांना विषबाधा



चारा टंचाईमुळे उपाशी असलेली जनावरे मिळेल ती वनस्पती चारा म्हणून खातात. भुकेच्या तावात अधाशीपने चारा खाताना विषारी वनस्पती देखील खाल्ल्या जातात. त्यामुळे जनावराला विषबाधा होऊन जनावराचा मृत्यू देखील होऊ शकतो.

उग्र वासामुळे तसेच चवीला रुचकर नसल्यामुळे जनावरे शक्यतो विषारी वनस्पती खात नाहीत. पण बऱ्याचदा दुष्काळी भागात चारा टंचाईमुळे जनावरे या हिरव्या वनस्पतींकडे आकर्षित होऊन नाइलाजास्तव विषारी वनस्पती खातात. त्यामुळे अशा विषारी वनस्पती खाल्याने जनावरांना विषबाधा होते. याशिवाय जास्त वेळ उपाशी असलेल्या जनावराला चरण्यासाठी सोडल्यानंतर जनावरे अधाशीपणाने चरतात. त्या वेळी देखील विषारी वनस्पती खाण्यात येऊन विषबाधा होण्याची शक्यता वाढते. विषबाधा टाळण्यासाठी आपल्या परिसरात उगवणाऱ्या विविध प्रकारच्या विषारी वनस्पतींची माहिती आपल्याला असायला हवी. आपल्याकडे सहसा कण्हेर, घाणेरी, रुई किंवा रुचकी, रानमोहरी, धोत्रा, बेशरम

कन्हेर : यापैकी कन्हेर ही वनस्पती आपल्याला माहितीच आहे. या वनस्पतीच्या बिया अत्यंत विषारी असतात. जनावराने या वनस्पतीची पाने किंवा बिया जास्त प्रमाणात खाल्ल्यास, जनावरांची भूक मंदावणे, पोटात वेदना होणे, हगवण लागणे, आकडी येणे अशी लक्षणे दिसतात. हृदयाचे ठोके कमी होऊन शेवटी जनावराचा मृत्यू देखील होऊ शकतो.

रुई किंवा रुचकी : विषारी वनस्पती पैकी दुसरी महत्वाची वनस्पती आहे रुई किंवा रुचकी. या वनस्पतीचे सर्वच भाग जसे की पाने, फुले, शेंगा या विषारी असतात.रुईची पाने जास्त प्रमाणात खाण्यात आल्यास लाळ गळणे, घसा जळजळणे, पचनास त्रास होणे, वेदना व जुलाब होणे ही लक्षणे दिसतात. या वनस्पतीमधील विषारी घटकांचा विशेषतः हृदयावर विपरीत परिणाम होतो. हृदयाचे ठोके अनियमित होतात. आणि शेवटी हृदयक्रिया बंद पडून जनावराचा मृत्यू होतो.

बेशरम : बेशरम या वनस्पतीमुळेही जनावरांना विषबाधा होते. ही वनस्पती खाल्ल्यामुळे शेळ्यांमध्ये विषबाधा होण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच मेंढी व वासरांमध्ये देखील विषबाधा होते. लाळ गळणे, जुलाब होणे, डोळ्यांची बुब्बुळे मोठी होणे, जनावर थरथर कापणे, चक्कर येऊण मृत्यू होणे अशी लक्षणे दिसतात.

घाणेरी : घाणेरी ही विषारी वनस्पती सर्वत्र मोठ्या प्रमाणात आढळते. या वनस्पती मधील विषारी घटकांमुळे यकृताची हानी होते. भूक मंदावणे, वजन घटणे, कावीळ होणे ही लक्षणे दिसून येतात.जनावराची त्वचा सूर्यप्रकाशाला संवेदनशील होते. यामध्ये शक्यतो डोळे व कान या भोवतीची त्वचा, नाक, कासेवरील त्वचा जास्त बाधित होते.

अशा प्रकारच्या विषारी वनस्पती चारा कापताना किंवा कुट्टी करून देताना खाद्यात येणार नाहीत याची काळजी घ्यावी. याशिवाय आपल्या भागातील विषारी वनस्पती ओळखून त्याठिकाणी जनावरे चरण्यासाठी सोडू नयेत. गोठ्यात नियमित फिरून पाहणी करावी. त्यामुळे जनावराच्या वागणुकीत झालेला बदल, विषबाधेशी निगडीत लक्षणे लगेच लक्षात येतात. अशी काळजी घेतली तर आपल्या जनावराला विषबाधेपासून नक्कीच वाचवता येईल.

# तलावातून बेसुमार पाणी उपसा सुरूच

**जिल्हा प्रशासन कागदी घोडे नाचविण्यातच समाधानी › भिषण पाणीटंचाईचा सामना करावा लागणार › बीड जिल्ह्यातील १६७ प्रकल्पात केवळ २४ टक्के उपयुक्त पाणीसाठा › ४६ प्रकल्प जोत्याखाली तर १२ प्रकल्प कोरडेठाक**





बीड: । प्रतिनिधी

उन्हाचा पारा वाढत असल्याने पाण्याचा वापर आणि बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला आहे.परीणामी तलावातील पाणी दिवसेंदिवस कमी होत आहे.जिल्ह्यातील १६७ प्रकल्पांमध्ये सध्या १८३ दलघमी ( २३.८८ टक्के ) एवढाच उपयुक्त पाणीसाठा आहे.आता १४५ प्रकल्पातील पाणीसाठा निम्म्यापेक्षा कमी आहे.४५ प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे.१२ प्रकल्प कोरडे ठाक पडले आहेत.जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५३६ मिलीमिटर आहे.गतवर्षी तब्बल ८३७ मिलीमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली होती त्यामुळे सगळे प्रकल्प ओसंडून वाहत होते.परंतुआता प्रकल्पातील पाणी कमी होण्यासह शेतातील विहीरी, सार्वजनिक पाणी योजनेच्या विहिरी,विंधन विहिरी कोरड्या पडत चालल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळांचा सामना करावा लागणार आहे. याचवेळी जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी आयुक्तांना संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपये निधीची आवश्यकता असल्याचे कळवले असुन तसे नियोजन सुरू आहे मात्र संभाव्य पाणी टंचाई अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी अनाधिकृत पाणी उपसा बंद ठेवण्याबाबत तहसीलदारांना दिलेल्या सुचना कागदावरच राहिल्या असुन तालावातुन पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले असुन कागदी घोडे नाचवण्यात जिल्हा व तहसिल प्रशासन समाधान मानत असुन संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी वास्तविक तहसीलदार यांनी नेमलेल्या पाटबंधारे विभाग, तहसील विभाग, महावितरण विभाग आणि गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

उन्हाळ्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे.जिल्ह्याचा अवर्षण प्रवण ईतिहास पाहता दुर्दैवाने पर्जन्यमानाने ओढ दिल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता.

जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणची विद्युत मोटारी व अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी,तहसील कार्यालयाचे कर्मचारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व महावितरण विभागाचे अधिकारी यांची संयुक्त पथके सर्व तहसीलदार यांनी स्थापित करून अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालण्यात यावा व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत. मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात चांगले पर्जन्यमान झाल्याने ८ एप्रिल पर्यंत एकही टँकर सुरू नाही.गतवर्षी एप्रिल मध्ये १५० तर मे आणि जून मध्ये हा आकडा ४६७ वर गेला होता. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी विभागीय आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई गावे निश्चित करून कृती आराखडा पाठवला आहे.त्यामध्ये २४५२ गावांसह १६७६ वाड्यांसाठी योजना राबविण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी ९४ लाख ४९ हजार रुपयांचा आराखडा पाठवला आहे.जुन जुलै पर्यंत पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे.त्यामुळे विहिर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण, टँकर सुरू करणे, तात्पुरती नळ योजना, जुन्या नळयोजनांची दुरुस्ती, नविन विहीरी खोदणे,विहारीतील गाळ काढणे असा संभाव्य टंचाई आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार करून आयुक्तांकडे पाठवला आहे. मात्र हा आराखडा केवळ कागदावरच राहु नये तर प्रत्यक्षात अमलात आणावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## कर्मयोगी संत गाडगेबाबांना भारतरत्न पुरस्कार द्या

### डॉ. सतीश साळुंके यांची राष्ट्रपतींकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

कर्मयोगी संत गाडगेबाबांचे हे १५० वे पुण्यतिथी वर्ष असून या निमित्ताने भारत सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च व नागरी पुरस्कार देऊन गौरवावे अशी मागणी प्रसिद्ध साहित्यिक तथा विचारवंत डॉ . सतीश साळुंके यांनी एका निवेदना मार्फत राष्ट्रपतींकडे केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून ही मागणी करणार असल्याचेही ते म्हणाले.

भारतीय संत संस्कृतीतील थोर समाजवादी संत भारतीय स्वच्छतेचे जनक कर्मयोगी गाडगेबाबा शिक्षण, स्वच्छता, रुढी- परंपरा, अस्पृश्यते विरुद्ध आंदोलन, पशुहत्या विरुद्ध अभियान, अंध अपंग निराधारांसाठी अन्न व निवारास छत्र, अशिक्षितांसाठी रोजगाराची सोय, तीर्थक्षेत्रात दलितांसाठी धर्मशाळा, व्यसना विरुद्ध लढा, कुष्ठरोग्यांची सेवा, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा या सारख्या विविध रचनात्मक कामाची वैशिष्ट्य असणारे प्रामाणिक आणि स्वच्छतेचे महामेरू गाडगेबाबांनी सामाजिक क्षेत्रात अतुलनीय कार्य केले देव देवळात नाही तर तो माणसात आहे, माणसाच्या सेवेत आहे आणि माणुसकीत आहे ही मूलभूत शिकवण त्यांनी भारतीय जीवनाला दिली. महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, आगरकर यांचे समकालीन असणारे गाडगे महाराज या सर्वांसाठी वंदनीय होते. बाबासाहेब व गाडगेबाबांचे वैचारिक नाते अद्वितीय होते. महात्मा गांधींनी तर त्यांना आपण थोर कर्मयोगी संत असल्याचे वर्धा येथे झालेल्या भेटीत म्हटले होते. कर्मयोगी गाडगेबाबांना भारतरत्न पुरस्कार देऊन बाबांच्या विचारांचा गौरव करावा अशी विनंती डॉ साळुंके यांनी राष्ट्रपतींना केली आहे.

## हमीभावाने खरेदी केलेल्या सोयाबीनची रक्कम तात्काळ मिळावी- उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी


केंद्र सरकार ने सोयाबीन ला ४८९२ रुपये इतका हमीभाव जाहीर केला होता. त्या प्रमाणे नेमून दिलेल्या हमीभाव केंद्रावर मोठया अपेक्षेने शेतकऱ्यांनी सोयाबीन घातले. सहा महिन्यांचा कालावधी लोटून गेला तरी अद्याप शेतकऱ्यांना हमीभावाची रक्कम मिळाली नही. शासनाने ही रक्कम तात्काळ द्यावी अन्यथा शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन परत करण्याची मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.



शेती मशागतीची कामे आटपून ग्रामीण भागात लग्नकार्य उरकुन घेण्याची तयारी शेतकरी करत आहेत. शेती मशागत खर्च, घराची - गायगोठ्याची डागडुजी हाती पैसा नसल्याने शेतकरी अडचणीत आहे. सोयाबीनला व्यापाऱ्यांनी अपेक्षित दर दिला नही, म्हणून शेतकऱ्यांनी हमीभाव केंद्रावर सोयाबीन घातले. परंतु आज सहा महिने उलटून गेले तरी हमी भावाची रक्कम अद्याप मिळाली नही. आज व्यापारी ४४०० रुपयांनी सोयाबीन खरेदी करत आहेत. हमीभावाचे पैसे सहा महिने वाट पाहूनही मिळत नसतील तर घातलेले सोयाबीन शेतकऱ्यांना परत द्यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.



बीड: शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी नगर पालिकेने नविन पाईपलाईन जोडणी व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. शुक्रवारी (दि.१८) रोजी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी पाईप लाईन जोडणीचे काम सुरू आसलेल्या उमरद खासला, म्हाळसजवळा येथे भेट दिली. सदरील काम वेळेत पुर्ण करून शहराला पाणीपुरवठा पुर्ववत करण्याच्या सुचना आ.क्षीरसागरांनी संबंधितांना दिल्या.



मागील आठवड्याभरात जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या तीन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही बाब वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी असून सर्वसामान्यासाठी वैद्यकीय सेवेचा आधार असलेल्या शासकीय रुग्णालयात अशी घटना घडल्याने सर्वसामान्य कुटुंबातील गोरगरीब रुग्णांनी उपचार कुठे घ्यायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. आज दि १८ रोजी सकाळी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी शासकीय रुग्णालयाला भेट देत तेथील प्रसूती विभागाची पाहणी केली आणि जिल्हा शैल्यचिकित्सक यांची भेट घेत दोशींवर कारवाई करण्याची मागणी केली.

## पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा वारंवार बंद

### गंभीर प्रकरणांची चौकशी करून कारवाई करा - अंगद सांगळे

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा वारंवार बंद राहत असल्याने संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या सेवेसाठी कॉल केल्यास ॲम्बुलन्स उपलब्ध नसेल,किंवा गाडी बंद आहे असे सांगण्यात येते. यामुळे गंभीर रुग्णांच्या नातेवाईकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. नुकत्याच एका प्रकरणात रात्रीच्या सुमारास एका गंभीर रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागत असताना १०८ ॲम्बुलन्स उपलब्ध झाली नाही. नाईलाजाने खाजगी वाहनातून बीडला हलवावे लागले. वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णाची प्रकृती अधिकच बिघडली यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा २४७ सुरु ठेवण्यात यावे तसेच वारंवार बंद राहणाऱ्या ॲम्बुलन्स सेवेबाबत उच्चस्तरीय चौकशी करणे

स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या जीवाशी खेळल्याचा आरोप निश्चित होईल. या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, तहसील प्रशासन आणि आरोग्य मंत्रालयाने लक्ष देण्याचे गरजेचे आहे नसता मोठी दुर्घटना होऊ शकते यामुळे तात्काळ पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा वारंवार बंद का असते यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी युवानेते अंगद सांगळे व पाटोदा तालुक्यातील सर्व सामान्य नागरिक करत आहे

## अक्षय माने यांची पाच जागेवर वर्ग दोनसाठी निवड

चौसाळा। प्रतिनिधी




इथून जवळच असलेल्या मानेवाडी तालुका बीड येथील अक्षय शिवाजी माने या युवकाने आपली जिद्द व चिकाटीच्या जोरावर वर्षभरात ५ जाग्यावर वर्ग नंबर दोन च्या जागावर नोकरी मिळून यश संपादन केले या यशाबद्दल चौसाळा परिसरातील नागरिकांतून अभिनंदन होत आहे.मानेवाडी तालुका बीड येथील सेवानिवृत्त प्राध्यापक शिवाजी माने यांचा मुलगा अक्षय शिवाजी माने यांनी पदवी शिक्षणाच्या नंतर पुणे येथून महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाच्या परीक्षेत पास होऊन जलसंधारण अधिकारी क्रमांक दोन पदावर पालघर येथे यश मिळवले त्यांनी यापूर्वी चार विविध पदावर आपली निवड होऊन यश संपादन केले या त्याच्या यशाबद्दल मानेवाडी व चौसाळा परिसरात नागरिक अभिनंदन करीत आहेत

## माझी कृषिमंत्र्यांनी पीक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास वेळ लागणार-वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

केंद्र व राज्यातील आरएसएसच्या विचारधारेचे भाजप व मित्र पक्षाच्या महाराष्ट्रातील तिन्ही माझी कृषिमंत्र्यांनी खाजगी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे न्यायालयाचे व शासनाचे आदेश असूनही शेतकऱ्याला २०२० पासून २०२५ पर्यंतचा पिक विमा शेतकऱ्यांना मिळण्यास वेळ लागणार असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. केंद्रातील भाजपच्या सरकारने २०१६ पासून शासनाच्या पिक विमा कंपन्या संदर्भातली संपूर्ण काम खाजगी कंपन्याला देऊन टाकले असून त्यामध्ये खाजगी कंपन्यांनी १० हजार कोटी पेक्षा जास्त मोठा घोटाळा शेतकऱ्याचे पिक विमा मध्ये केलेला आहे. खाजगी पिक विमा कंपनीवर न्यायालयाचे आदेश असूनही नियमानुसार कारवाई केली जात नाही .त्याचे कारण आजी माजी कृषिमंत्र्यांना पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी दिली गेलेली आहे. त्यामुळे राज्यातील त्रिमूर्ती सरकारकडून पिक विमा कंपन्या काळया यादीत टाकण्यासंदर्भात कारवाई केली जात नाही असा आरोप कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे. कृषी विभागाचे प्रधान सचिव यांनी भाजप व आर एस एस च्या केंद्रा सरकारकडे चार वेळेस पत्र व्यवहार केलेला आहे पण शेतकऱ्यांना पिक विमा देणे संदर्भात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिके पेरणी पासून काढणे पर्यंतचा कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे नैसर्गिक गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ पाऊस कमी पडल्याने शेतीचे उत्पन्नावर परिणाम होतो. पिक विमा संदर्भात शेतकऱ्याचे अनेक प्रकरणे राज्य सरकार मा. तालुका न्यायालय , जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात खाजगी पिक विमा कंपनीच्या व सरकारच्या विरोधात चालू आहेत,



खाजगी पिक विमा कंपन्या बाबत आजतागायत शेतकऱ्यासाठी शासनाकडून कोणताही निर्णय दिला नसल्यामुळे पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होत नाहीत. कारण राज्यातील सर्वच आजी-माजी कृषीमंत्र्यांना टक्केवारी खाजगी विमा कंपन्याकडून घेतली आहे . सरकारकडून २० ते ३५ टक्के खाजगी पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. त्रिमूर्ती सरकारने १ रुपयात पिक विमा भरण्या संदर्भात शेतकऱ्याला लोभ दाखवून शेतकऱ्याची खूप मोठ्या प्रमाणावर दिशाभूल केली . शेतकऱ्याचा टक्केवारीचा हिस्सा, केंद्र व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून पीक विम्याचे विविध निकषाचे नुकसान भरपाई संदर्भात पालन करून टक्केवारीनुसार वेगवेगळ्या पिकाचा पिक विमा शेतकऱ्याला दिला जातो. त्यामध्ये खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी यांच्यासोबत तोडजोड करून लोकप्रतिनिधी व कृषी मंत्री कृषी आयुक्त सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर आर्थिक तोडजोड करून शेतकऱ्याला पिक विमा वाटप न होऊ देण्याचे खरे कारण टक्केवारी असल्याचा आरोप कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . पिक विमा संदर्भात शेतकऱ्यांसाठी एनडीआरएफ व एस डी आर एफ निकषचे पालन खाजगी पिक विमा कंपन्या करीत नाहीत. न्यायालयाचे शासनाला आदेश पीक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्यासंदर्भात दिलेले असतानाही शेतकऱ्याला पिक विमा वाटप करण्याबाबत कंपन्या अडथळे करीत असल्यामुळे त्रिमूर्ती सरकारने नियमानुसार खाजगी पिक विमा कंपन्या काळा यादीत टाकण्याचे आदेश काढावेत अशी मागणी शासनाकडे कॉंग्रेसनेते वसंत मुंडे यांनी केली आहे.

## पाली येथे योग प्रशिक्षणाचा समारोप कार्यक्रम



बीड । प्रतिनिधी

मौजे पीएमश्री माध्यमिक शाळा पाली येथे मागील तीन महिन्यापासून योग प्रशिक्षक पंढरीनाथ क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबिर संपन्न झाले. पंढरीनाथ क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना योगा विषयी जनजागृती घडावी तसेच विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये कपालभाती, वृक्षासन, ताडासन, भामरी, सूर्यनमस्कार, असे विविध प्राणायामचा सराव करून विद्यार्थ्यांकडून घेतला तसेच विद्यार्थ्यांची योग परीक्षेचे आयोजन करण्यात आले ही परीक्षा प्राथमिक व माध्यमिक अशी दोन गटात घेण्यात आली. योग प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक, आरोग्य चांगले राहण्यास मदत होणार आहे यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आहे.आज समारोप करण्यात आला यावेळी आदरणीय क्षीरसागर सर यांचा शाळेतील सर्व शिक्षकांनी सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक लाडसर हे होते कार्यक्रमाचे संचालन राठोड सर यांनी केले यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी व काब्दे मॅंडम, तळेकर सर,पायके सर, हंगे मॅडम, म्हैत्रे मॅंडम,शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले,यावेळी सर्व विद्यार्थी उपस्थित होते

# स्वाराती रुग्णालयात नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी आधुनिक यंत्रसामुग्रीची भर

## आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नांमुळे ७० लाख रुपयांची यंत्रसामुग्री मंजूर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील स्वाराती रुग्णालयात रुग्णसेवा अधिक सक्षम व अद्ययावत करण्याच्या दृष्टीने मोठी भर पडली आहे. रुग्णालयात नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक एंडोस्कोपिक कॅमेरा सिस्टीम उपलब्ध झाली असून मायक्रो डीब्रायटर मशीनसाठी निधी मंजूर झाला आहे. रुग्णसेवा अद्ययावत करण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी या दोन महत्त्वाच्या यंत्रसामुग्रीसाठी शासनाकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.**




मायक्रो डीब्रायटर मशीनसाठी ३० लाखांचा निधी मंजूर नाकातील विविध व्याधींवर अचूक आणि सुरक्षित शस्त्रक्रिया करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या मायक्रो डीब्रायटर मशीनसाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच या यंत्रासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून त्यानंतर मशीन रुग्णालयात उपलब्ध होणार आहे. या यंत्रामुळे नाकातील शस्त्रक्रिया अधिक सुलभ, सुरक्षित आणि परिणामकारक होतील.

**४० लाख रुपयांची एंडोस्कोपिक कॅमेरा सिस्टीम झाली उपलब्ध**

तसेच ४० लाख रुपये खर्च करून खरेदी करण्यात आलेली एंडोस्कोपिक कॅमेरा सिस्टीम देखील नुकतीच रुग्णालयात दाखल झाली आहे. लवकरच या यंत्राचे इन्स्टॉलेशन पूर्ण होणार असून त्यानंतर ती कार्यान्वित होईल. ही यंत्रणा नाकाच्या ऑपरेशनसाठी वापरण्यात येणार असून डॉक्टरांना अधिक स्पष्ट आणि सूक्ष्म निरीक्षण करता येणार आहे.

**रुग्णसेवेत महत्त्वपूर्ण टप्पा**

या दोन्ही यंत्रांमुळे स्वाराती रुग्णालयात ईएनटी विभागातील (नाक, कान, घसा) शस्त्रक्रियेसाठी अत्यल्प दरातआधुनिक उपचार पद्धतींचा लाभ रुग्णांना मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. यामुळे शस्त्रक्रियांचे यशस्वी प्रमाण वाढेल तसेच रुग्णांना जलद बरे होण्यास मदत होईल. या निर्णयामुळे अंबाजोगाई आणि परिसरातील रुग्णांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. स्वाराती रुग्णालयात रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी सदरील यंत्रसामुग्री उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# शासकीय गोदामातील धान्याचे ११ कट्टे लंपास

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील शासकीय धान्य गोदामातील खिडकीचे गज तोडून धान्याचे ११ कट्टे. लंपास पास केले आहे. चोरट्यांनी आत प्रवेश करत गोदामातील गहू व तांदूळ या धान्याचे ११ कट्टे लांबवल्याची घटना उघडकीस आली याप्रकरणी गोदाम रक्षक सोमनाथ अशोक होळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात आज्ञात चोरटे.विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे विशेष म्हणजे तहसील कार्यालयाप्रमाणेच प्रशासकीय गोदामातील सीसीटीव्ही देखील बंद असल्याचे समोर आले. याबाबत गोदाम रक्षकाने पाटोदा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादमध्ये म्हटले की १४ एप्रिल रोजी पहाटे साडेतीन ते साडेचार यादरम्यान ही घटना घडली तर त्यांनी गोदामाच्या खिडकीचे गज. तोडून.आत.प्रवेश केलं आणि गोदामातील गहू तांदळाची पोतीचोरून नेली यामध्ये पन्नास किलो वजनाची गव्हाची सातपुते आणि अंदाजे ७००० रुपये तर तांदळाची ५० किलो वजनाची चार पोती अंदाजे चार हजार रुपये एकूण ११००० रुपयाचे धान्य चोरीला गेले.

# माजलगाव न.प.चे मुख्याधिकारी, ओएस हजर नसल्याने शिवसेनेने आंदोलनाचे निवेदन दिले खुर्चीला

## पालिकेकडून मूलभूत सुविधा मिळेना, शहरातील विविध समस्यासाठी शिवसेनेचे २ मे ला रास्तारोको आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील विविध नागरी समस्या चे निवेदन देण्यासाठी नगरपरिषद मध्ये मुख्याधिकारी व कार्यालय अधीक्षक गैरहजर असल्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी चक्क मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला निवेदन देऊन नागरी समस्या साठी दोन मे रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

शहरांमध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे मुख्य रोडवर सिंदफणा पुलाच्या जवळ कचऱ्याचे ढिगारे गल्लीबोळात तुंबलेल्या नाल्या यामुळे पसरलेली दुर्गंधी शहरात स्वच्छता पावसाळ्यापूर्वी मोहीम राबवण्यात यावी मुख्य रस्त्यासह गल्लीबोळातील विद्युत पूलवर लाईट बसविण्यात यावे त आणि मुख्याधिकारी



चंद्रकांत चव्हाण यांच्या २० महिन्याच्या कार्यकाळातील कारभाराची चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागण्याचे निवेदन देण्यासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे दिनांक १७ एप्रिल रोजी नगरपरिषद कार्यालयामध्ये गेले असता नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण कार्यालय अधीक्षक प्रमुख कर्मचारी कोणीच उपस्थित नव्हते त्यामुळे या पदाधिकाऱ्यांनी सदर मागण्याचे निवेदन चक्क मुख्याधिकारी यांच्या खुर्चीला दिले आहे आणि दिनांक दोन मे रोजी नागरी समस्या संदर्भात नगरपरिषद कार्यालयासमोर मेन रोडवर रस्ता रोको आंदोलन शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज परळीत महत्त्वपूर्ण बैठक

## खा.बजरंग सोनवणे व राजेंद्र मस्के यांची उपस्थिती; पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने आज शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे.





या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जेष्ठ नेते फुलचंदभाऊ कराड, राजेसाहेब देशमुख आणि राजेभाऊ फड, बाळासाहेब देशमुख, यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे. या बैठकीस सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर ◀◀ पान ३ वर

# शॉर्टसर्किटमुळे शेडनेटला आग; शेतकऱ्याचे ३० लाखाचे नुकसान, पंचनामा करण्यास दिरंगाई

**शिरूर । शंकर भालेकर**

शेतामध्ये पिक घेण्यासाठी उभारण्यात आलेले शेडनेट आगे मध्ये जळून खाक झाल्याची घटना तालुक्यातील खालापूर या गावांमध्ये शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास घडली असून, या आगीमध्ये शेतकऱ्यांचे ३० लाख रुपये किमतीचे शेडनेट, ड्रिप्स, फवारणी करण्यासाठी लागणारे विविध साहित्य जळून खाक झाले आहे.


शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथील प्रगतशील शेतकरी बळीराम मारुती उगले यांनी आपल्या शेतामध्ये विविध पिके घेण्यासाठी गेल्यावर्षीच पोखरा योजनेअंतर्गत सुमारे ३० लाख रुपये खर्च करून गट नंबर ७३४ मधील एक एकर मध्ये शेडनेटची उभारणी केली होती. यामध्ये झेंडू,टोमॅटो, ढोबळी मिरची,वांगी, टरबूज अशी विविध पिके घेत त्यांनी खालापुरी पंचक्रोशीत ◀◀ पान ३ वर




### पंचनामा करून प्रस्ताव पाठवला जाईल

खालापुरी येथील शेतकरी बळीराम मारुती उगले या शेतकऱ्याचे शेडनेट ग्रहाला आग लागून मोठे नुकसान झाल्याची माहिती आमच्या कर्मचाऱ्याकडून मला मिळाली आहे. तसे त्यांनी फोटो हे पाठवले आहेत. या ठिकाणी नक्की कशामुळे लागली याचा पंचनामा होणे बाकी आहे. मी आजारी असल्याच्या कारणामुळे आज तिकडे येऊ शकलो नाही. मात्र लवकरच अधिकारी कर्मचाऱ्याला घटनास्थळी पाठवून पंचनामा करून शॉर्टसर्किटमुळे जर ही आग लागली असेल तर तसा प्रस्तावही दाखल करण्यात येईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अभियंता निकम यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली आहे.

# सोमेश्वरमध्ये श्रवणीय भीमगीत रजनी




अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त सोमेश्वर शैक्षणिक संकुलात अभिवादन सभा व श्रवणीय भीमगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी सोमेश्वर शैक्षणिक संकुलाच्या तीनही विभागातील विश्वजित वाघमारे, प्रसाद कस्तुरे, वैष्णवी वाघमारे, यशश्री लव्हारे, विश्वजित गंभीरे, दिपक काबरे, फोबीय शेख, प्रदिप पटेकर, गणेश गंभीरे, कार्तिक कदम, मनोज नाईक, साईनाथ गंभीरे, सार्थक गायकवाड, समर्थ अतखाने यांनी सिंथ, ढोलकी चिपळ्या, झांज व कोरसच्या साथीने ''आहे कोणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला, दोनच राजे इथे जन्मले, तुम्ही खातात त्या भाकरीवर बाबासाहेबांचं नाव हाय र, नांदणं नांदणं होतं रमाचं नांदणं आणि जगात गाजावाजा भिमराव एकच राजा'' आदी श्रवणीय भीमगीते सादर केली. भीमगीत रजनीचे सुत्रसंचलन व शेरोशायरी फोबिया शेख तर आभार प्रदर्शन व शेरोशायरी यशश्री लव्हारे यांनी केले. सहभागी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व सुश्राव्य भीमगीत रजनी सादर ◀◀ पान ३ वर

# गीता परिवाराच्या शिबिरास प्रतिसाद




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील गीता परिवाराच्या वतीने चला झेप घेऊ हरवलेल्या आरोग्याकडे, चला झेप घेऊ लुप्त झालेल्या संस्काराकडे,चला झेप घेऊ भारत मातेकडे या उद्दीष्टांवर आधारित तीन दिवशीय शिबीर घेण्यात आले.**

शिबीराच्या उदघाटन प्रसंगी बोलताना नगसेविका तथा दासोपंत बाल विद्या मंदीरच्या संचालिका वासंती बाबजे म्हणाल्या की,संस्कार म्हणजे केवळ धार्मिक विधी किंवा परंपरा नसून, ते व्यक्तीच्या जीवनात चांगले बदल घडवून आणणारे एक शक्तिशाली माध्यम आहे. संस्कारामुळे व्यक्तीला स्वतःला ओळखायला मदत होते, चांगले निर्णय घेता येतात आणि समाजासाठी एक चांगला नागरिक बनण्यास मदत होते मात्र या गोष्टी बालवयापासूनच आत्मसात व्हायला पाहीजेत असे त्यांनी सांगितले गीता परिवाराच्या मंगल दरगड म्हणाल्या की, मुलांनो, तुम्हाला चांगली व्यक्ती बनायचे असल्याने स्वतःवर चांगले संस्कार करून घेण्याचा प्रयत्न करा. चांगले संस्कार देण्यासाठीच गीता परिवाराचे शिबीर असल्याचे त्यांनी सांगितले. तीन दिवशीय

शिबीरात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या शिबीरार्थींनी आरोग्य,संस्कार, राष्ट्रभक्ती या विषयीचे मुल्य, विचार जाणून घेतले.श्रीकृष्ण भगवद्? भक्ती, भगवद गीता, भारतमाता, विज्ञान दृष्टी,स्वामी विवेकानंदांचे विचार अशा पंचसुत्रीवर आधारित काम करणाऱ्या गीता परिवाराच्या तीन दिवशीय शिबीरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी रेणुका झंवर,शिल्पा कात्रे, मोनिका मुंदडा,दिपा चोकडा,स्मिता सारडा, प्रणिता मंत्री,वर्षा रांदड आदीसह इतरांनी परिश्रम घेतले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधत स्तंभलेखक उत्तम बोडखे यांचा गौरव!

आष्टी । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आष्टी येथील अनिलभैय्या नगर भागामध्ये अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात स्तंभ लेखक तथा दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांचा मान्यवरांच्या हस्ते आज गौरव करण्यात आला.विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आष्टी येथील जेष्ठ पत्रकार तथा स्तंभलेखक उत्तम बोडखे यांचे आजपर्यंतचे कार्य कौतुकास्पद असून राजकीय,सामाजिक, धार्मिक, वैचारिक आदि क्षेत्रामध्ये मार्गदर्शन करणारे आहे.त्याची दखल घेत या वैविध्यपूर्ण स्तंभालेखनाबद्दल आष्टी येथील अनिलभैय्या नगरामध्ये संपन्न झालेल्या भीमजयंती कार्यक्रमात भाजप अनुसूचित जाती सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.वाल्मीकतात्या निकाळजे,सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद



अल्लाउद्दीन, विधीज्ञ रत्नदीप निकाळजे आदि सह मान्यवरांच्या हस्ते उत्तम बोडखे यांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.दरम्यान उत्तम बोडखे यांनी आजपर्यंतच्या कारकीर्दीत पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम केले असे सांगून बोडखे यांचे सातत्यपूर्ण लिखाण आष्टीकरांना योग्य दिशा देणारे आहे अशा शब्दात भाजप अनुसूचित जातीचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.वाल्मीकतात्या निकाळजे यांनी त्यांचा गौरव केला.प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी उत्तम बोडखे यांची पत्रकारिता सकारात्मक असून गुणवंतांना न्याय देण्याचे काम करते असे सांगितले.ॲड. रत्नदीप निकाळजे यांनी उत्तम बोडखे यांचा लेखणी सम्राट असा उल्लेख केला.या भीम जयंती उत्सव कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राजकीय, सामाजिक,धार्मिक,वैचारिक, शैक्षणिक आदिसह पत्रकारिता क्षेत्रातील बांधव,भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारूड्या मुलाने फोडली बापाची दुचाकी!

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन जालना बसस्थानकात एसटी चालक दादाराव विठ्ठलराव ढेकळे यांच्या मुलाने दुचाकी दिली नाही म्हणून रागाने दुचाकी फोडून नुकसान केले.

एसटीचालक दादाराव ढेकळे जालना बसस्थानकात चालक म्हणून कर्तव्यावर आहे. त्यांचा मुलगा अजय व विनय या दोघांनी वडिल कर्तव्यावर असतांना दुचाकी देत नाही म्हणून त्यांची मोटार सायकल क्र. एमएच. बीएल २६०२ फोडून नुकसान केले. विशेष म्हणजे अजय व विनय यांनी दारूच्या नशेत गाडीचे नुकसान केले. यावेळी पोलिस कर्मचारी पाटोळे यांनी मध्यस्थी केली. व घटनेची नोंद सुरक्षा रक्षक विशाल भांबळे यांनी रजिस्टर घेतली.

# कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त हरिनाम सप्ताह



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. हा सप्ताह दि.१९ ते २६ एप्रिल २०२५ या कालावधीत होत असुन त्यामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,श्रीराम नामजप व अखंड हरिनाम सोहळा होणार आहे.या सप्ताहात ह.भ.प. परसराम बन महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्रीराम नाम जप होणार आहे.सर्व भाविक भक्तांनी श्रवण सुखाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह आयोजन समितीने केले आहे.

दि.१९ एप्रिल रोजी ह.भ.प. शिवचरित्रकार राजेंद्र महाराज वाघमारे (गोंदी), दि.२० एप्रिल रोजी भागवताचार्य ह.भ.प.कुशल महाराज पुरी (परभणी),दि.२१ एप्रिल रोजी झी टाकीज फेम विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर (कांबी), दि.२२ एप्रिल रोजी ह.भ.प. माऊली महाराज धायगुडे शास्त्री (भगवानगड),दि.२३ एप्रिल रोजी ह.भ.प. विष्णु महाराज अंतरकर (गेवराई), दि.२४ एप्रिल रोजी विनोदाचार्य ह.भ.प. माऊली महाराज (खडकवाडीकर), दि.२५ एप्रिल रोजी विनोदाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (नेवासा) यांचे हरि कीर्तन होणार आहेत.गुरुवार दि. २४ एप्रिल रोजी रात्री ११ ते १ यावेळात भारुड सम्राट ह.भ.प.सावता केशव फुले महाराज (बारामती) यांचा भारुडाचा कार्यक्रम होणार आहे.दि.२५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वा. दिंडी प्रदक्षिणा व पादुका मिरवणुक होईल.रात्री १२ वा. शिवस्वरुप बन महाराज संजीवन समाधीवर पुष्पवृष्टी होणार आहे.या सप्ताहात व्यासपीठ चालक म्हणून ह.भ.प.शरद महाराज आहेर (आळंदी) हे काम पाहत आहेत. शनिवार दि.२६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ याळेत ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री (आळंदी) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे.सप्ताहात ह.भ.प. संगीत विशारद ज्ञानेश्वर महाराज औटे,संगीत विशारद ह.भ.प.इंद्रजीत महाराज येवले, मृदंग सम्राट मोहन महाराज घुले,मृदंग सम्राट प्रथमेश महाराज शिंदे यांची साथ संगत लाभणार आहे.यावेळी आ. सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे , माजी आ.साहेबराव दरेकर,माजी आ. बाळासाहेब आजबे, देविदास धस, सतिषआबा शिंदे यांच्यासह राजकीय,सामाजिक,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिसरातील भावीक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संत शिवस्वरुप बन महाराज सप्ताह समिती,तरुण मंडळ आणि ग्रामस्थांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार, दि.१९ एप्रिल २०२ । पान ७

# ऑलिंपिकमध्ये अधिकाधिक पदके मिळवून देण्यासाठी खेळाडूंनी तयारी करावी-राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**पुणे । प्रतिनिधी**

''देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०३६ मधील ऑलिंपिक स्पर्धा भारतात व्हावी, यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे देशाला ऑलिंपिक स्पर्धेत अधिकाधिक पदके मिळवून देणारे खेळाडू तयार करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी खेळाडूंची तयारी करवून घेण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतला पाहिजे. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी मुलांना खूप लहान वयापासूनच खेळांमध्ये सहभागी करून घ्यावे लागेल,'' असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्य सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन वर्षांतील 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारां'चे वितरण बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे शुक्रवारी झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पणनमंत्री जयकुमार रावल, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, प्रशांत बंब, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा व युवक सेवा आयुक्त हिरालाल सोनवणे, विभागीय



आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात ज्येष्ठ बॅडमिंटन पटू प्रदीप गंधे यांना २०२२-२३ या वर्षातील 'शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार', तर ज्येष्ठ कबड्डीपटू शकुंतला खटावकर यांना २०२३-२४ या वर्षातील 'शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार' राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी राज्यातील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडू, संघटक, प्रशिक्षकांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये जीवन गौरव पुरस्कार, दिव्यांग खेळाडू पुरस्कार, खेळाडू पुरस्कार, थेट पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक-जिजामाता पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, साहसी क्रीडा पुरस्कार असे एकूण १५९ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

राधाकृष्णन म्हणाले,''महाराष्ट्राचा इतिहास पाहता उद्योग, शिक्षण, सामाजिक सुधारणा, क्रीडा अशा विविध क्षेत्रात देशात महाराष्ट्राने भरीव योगदान दिले आहेत. आज क्रीडा क्षेत्र तांत्रिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या अत्यंत स्पर्धात्मक झाले आहे. यात खेळाडूंचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुदृढ राहणे महत्त्वाचे आहे. तसेच, विविध पातळ्यांवरील क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी मुलांना खूप लहान वयापासूनच खेळांमध्ये सहभागी करून घ्यावे लागेल. शाळा आणि पालकांनी मुलांना खेळ आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमध्ये खुल्या जागांची मोठी कमतरता आहे, तिथे शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थ्यांना खेळाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक मैदाने आणि क्रीडा क्लब यांच्यासोबत सहयोग करू शकतात. राज्यातील सर्व जिल्ह्यात क्रीडा संकुले स्थापन करण्यात आली असून क्रीडा सुविधांमध्ये वाढ करण्यात येत आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरणे यांनी केले.

खेळासाठी पायाभूत सुविधा तालुक्यापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न

''राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर जिंकून येणाऱ्या राज्यातील खेळाडूंचा उचित सन्मान झाला पाहिजे, यासाठी बक्षिसांच्या रक्कमेत भरीव वाढ केली आहे. खेळाडूंसाठी नोकरीची दालने खुली केली असून त्यांना थेट सरकारी नोकरी दिली जात आहे. खेळण्यासाठीच्या पायाभूत सुविधा तालुक्यापर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत,'' असा सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

# शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक; तब्बल ६२ लाखांना घातला गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एका महिलेसह दोघांची ६२ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत ४६ वर्षीय महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, सायबर चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.



तक्रारदार (वय ४६) शिवाजीनगर भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी महिलेच्या मोबाइलवर मार्च महिन्यात संपर्क साधला. शेअर बाजारातील दलाल असल्याची बतावणी चोरट्यांनी केली. गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखवून जाळ्यात ओढले. नंतर महिलेला पैसे गुंतविण्यास सांगितले. महिलेने पैसे गुंतविल्यानतंर तिला सुरुवातीला परताव्यापोटी पैसे देण्यात आले.

परतावा खात्यात जमा झाल्यानंतर महिलेचा विश्वास बसला. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला आणखी रक्कम गुंतविण्यास सांगितले. महिलेने चोरट्यांच्या खात्यात महिनाभरात वेळावेळी ३१ लाख ६० हजार रुपये जमा केले. त्यानंतर महिलेला परतावा देण्यात आला नाही. चोरट्यांशी संपर्क होत नसल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसंकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक सूर्यवंशी अधिक तपास करत आहेत.

अशाच पद्धतीने सायबर चोरट्यांनी बाणेर भागातील ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक केली आहे. तक्रारदार शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने चोरट्यांनी त्यांना पैसे गुंतविण्यास सांगितले. त्यांनी वेळोवेळी चोरट्यांच्या खात्यात ३१ लाख २० हजार रुपये जमा केले. त्यांना परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ निरीक्षक नवनाथ जगताप तपास करत आहेत. शेअर बाजारात गुंतणवणुकीच्या आमिषाने फसवणुकीचे प्रकार वाढीस लागले आहेत. चोरट्यांनी पुणे परिसरातील नागरिकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातला आहे. चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# भारती विद्यापीठात होणार राज्यातील पहिले दोन दिवसीय बीज संमेलन

**पुणे । प्रतिनिधी**

सह्याद्री देवराई व भारती विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ व २६ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील पहिले दोन दिवसीय बीज संमेलन होणार आहे. हे संमेलन भारती विद्यापीठाच्या पुणे- सातारा रोड येथील धनकवडी शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात होणार आहे. या संमेलनात बीजमाता राहीबाई पोपेरे यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. एक लाख रुपये व सन्मान पत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सह्याद्री देवराईचे संस्थापक अध्यक्ष व अभिनेते सयाजी यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये ही माहिती दिली. यावेळी सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, विचारभारतीचे संपादक प्रा.मिलिंद जोशी उपस्थित होते. 'एकतरी झाड लावूया चला सावली पेरूया ' हे या संमेलनाचे बोधवाक्य आहे. सह्याद्री देवराईचे दहा तज्ञ सदस्य भारती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना ताम्हिणी घाटात सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बीज संकलनाचे शास्त्रीय प्रशिक्षण देणार आहेत. प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी भारती विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार




असून भारती विद्यापीठाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी आणि सह्याद्री देवराईचे पर्यावरणप्रेमी मिळून राज्यातून बिया गोळा करणार आहेत.

हरित संपत्तीचे दालन या प्रदर्शनाचे उद्घाटन भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी राहीबाई पोपेरे यांना जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रीय गायक आर्चाय पंडित मुकुल शिवपुत्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या बियांतून भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला पतंगराव कदम यांची बीजतुला करून त्यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदाना विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे.

# तू माझ्याशी लग्न कर, नाहीतर...; तरुणीला धमकी देणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

**पुणे प्रतिनिधी**

राज्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून अत्याचाराच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. 'तू माझ्याशी लग्न केले नाहीस, तर तुझे लग्न होऊ देणार नाही. फोटो व्हायरल करेन, करंट लावून जीव देईन' अशा धमक्या देत तरुणाने १९ वर्षीय तरुणीचा मानसिक छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याप्रकरणी तरुणीने वारजे माळवाडी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. मे २०२४ पासून पीडित तरुणी आणि आरोपी तरुण एकमेकांच्या ओळखीचे होते. तरुणाने लग्नासाठी तिला विचारले होते. मात्र, तिने लग्नास नकार दिला. नंतर तरुणाने तिचा पाठलाग सुरू केला. तिने नकार दिल्यानंतर त्याने सतत लग्नासाठी दबाव आणला. १५ एप्रिल २०२५ रोजी आरोपीने 'तू लग्न केले नाहीस तर विष पिऊन किंवा करंट लावून आत्महत्या करीन' अशी धमकी दिल्यानंतर पीडितेने पोलिसांकडे धाव घेतली. तसेच, 'तू माझ्याशी लग्न न केल्यास, तुझे फोटो फेसबुक, इंस्टाग्रामवर टाकेन' असे बोलून त्याने तिची बदनामी करण्याची धमकी दिली. पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# आधीच पूर्ववैमनस्य त्यात गाडीला कट मारल्याने ठिणगी पडली, पुण्यात तरुणाला जागेवर संपवलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील चंदनगर परिसरात एका तरूणाच्या डोक्यात फरशी घालून संपवल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. काल (गुरुवारी) रात्री चंदनगर परिसरात एका तरुणाचा खून (झींपिश उीळाश छश्रि) करण्यात आला आहे. प्रदीप अडागळे असे मृत्यू झालेल्या तरूणाचे नाव आहे. ऋषी काकडे आणि त्याची आई सुनीता काकडे या दोघांनी मिळून त्याचे डोक्यात फरशीच्या तुकड्याने वार केले. अडागळे गंभीर अवस्थेत असताना त्याला ससून येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

प्रदीप अडागळे आणि ऋषी काकडे यांच्यामध्ये बहिणीची छेड काढल्याने जुना वाद होता. त्यानंतर काल मित्राचा गाडीला कट मारल्याने




वाद वाढला आणि त्यातून हत्या केली. पुण्यातील चंदन नगर परिसरातील गुरुवारी रात्री साडे ११ दरम्यान ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, वर्षभराची खुन्नस आणि राग यातून दोघांनी प्रदीप अडागळेच्या डोक्यात फरशी (झींपिश उीळाश छश्रि) घालून त्यास संपवलं. पुण्यातील चंदन नगर परिसरातील गुरुवारी रात्री साडे ११ दरम्यानची ही घटना आहे. वर्षभरापासून दोघांमध्ये खुन्नस (झींपिश उीळाश छश्रि) होती. बहिणीला त्रास का देतो म्हणत कायम दोघामध्ये वादावादी व्हायची. काल रात्री साडे अकराच्या सुमारास दोघे चंदननगर परिसरात असलेल्या भाजी मंडीमध्ये ऋषी काकडे त्यांची आई सविता आणि मित्र शुभम मांढरे याने प्रदीपला थेट फरशीने मारहाण केली. यात प्रदीप गंभीर जखमी झाला. रात्रीच प्रदीपला ससूनला उपचारासाठी नेण्यात आलं होतं. मात्र या घटनेमध्ये त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. गुरूवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास चंदननगर भाजी मार्केट टॉयलेट शेजारी व आदिनाथ स्टिलसमोर चंदननगर भाजी मार्केट, चंदननगर पुणे १४ या ठिकाणी बहिणीची छेड काढल्याच्या कारणावरुन प्रप्रदीप अडागळे याला ऋषीकेश काकडे, ऋषीकेश काकडे याची आई व इतरांनी ठार मारण्याचे उद्देशाने फरशीचे तुकड्याने डोक्यावर, तोंडावर मारुन गंभीर जखमी केले, यानंतर त्याला उपचारांसाठी रूग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र, त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

# विविध मागण्यांसाठी सिमेंट कंपनीसमोर बेमुदत उपोषण

**पाटस । प्रतिनिधी**

पाटस (ता. दौंड) परिसरातील श्री सिमेंट कंपनीच्या विरोधात व वेगवेगळ्या मागण्यांसाठी गुरुवारी (दि. १७) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास जय शिवसंग्राम संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव साळुंखे व दौंड तालुकाध्यक्ष संजय शिंदे यांनी बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. या उपोषणाला स्थानिक शेतकर्यांनी पाठिंबा दिला आहे.

येथे असलेल्या श्री सिमेंट कंपनीच्या हवेत उडणार्या सिमेंटच्या धुलीकणांमुळे परिसरातील शेतकर्यांच्या जमिनी नापीक होत असून पिकांचे अतोनात नुकसान होऊन शेतकर्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. यापूर्वी देखील संबंधित कंपनी प्रशासन व प्रदूषण विभाग यांच्याकडे या संदर्भात लेखी तक्रारी




करूनही संबंधित विभाग व कंपनीने कोणतीही दखल घेतली नाही.

सिमेंट कंपनीतून उडणार्या सिमेंटच्या धुलीकणांमुळे परिसरातील नागरिकांना श्वसन व दम्याचे विकार होत आहेत. त्याचप्रमाणे जनावरांच्या चार्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या चार्यांवर सिमेंटच्या धुलीकणांचा थर साचल्याने जनावरे हा चारा खात नाहीत. त्यामुळे शेतकरी एकीकडे जमिनीची वाढणारी समस्या, दुसरीकडे आरोग्य समस्या आणि जनावरांच्या चार्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. उद्योग संचालनालय यांचे आदेशाप्रमाणे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीच्या पर्यावरणीय ना हरकत दाखल्यासाठी घेतलेल्या जनसुनावणीमधील इतिवृत्तांप्रमाणे स्थानिकांना किमान ८० टक्के रोजगार देण्याचे बंधन असतानाही स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून न देता तालुक्याबाहेरील तसेच जिल्ह्याबाहेरील लोकांना कंपनीत कामे व रोजगार दिलेला आहे. स्थानिकांवर ही कंपनी जाणीवपूर्वक अन्याय करीत असल्याचा उपोषणकर्त्यांचा आरोप आहे. पाटस हद्दीमधून रस्त्याने सिमेंटची वाहतूक करणारी वाहने ही क्षमतेपेक्षा जादा माल भरून वाहतूक करत असल्याने या ओव्हरलोड मालाच्या वाहतुकीमुळे रस्त्यांवर खड्डे पडून रस्ता खराब झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे रस्त्यावरून शाळेत जाणारी मुले, नागरिक यांच्या जिवाला धोका निर्माण होत असल्याचे लेखी निवेदने वेगवेगळ्या कार्यालयांना जय शिवसंग्राम संघटनेच्या वतीने देण्यात आली आहेत.

# थकीत एफआरपी ३० एप्रिलपर्यंत न दिल्यास कारवाई; साखर आयुक्त सिध्दाराम सालीमठ यांचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील ३३ कारखान्यांनी ८३१ कोटी ११ लाख रुपयांइतकी शेतकर्यांच्या उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) थकीत ठेवली आहे. कारखान्यांनी ही रक्कम ३० एप्रिलपर्यंत शेतकर्यांच्या बँक खात्यावर जमा न केल्यास कारवाई करण्याचा इशारा साखर आयुक्त सिध्दाराम सालीमठ यांनी बुधवारी (दि. १६) झालेल्या सुनावण्यांमध्ये दिला आहे.

राज्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम संपुष्टात येऊनही शेतकर्यांच्या उसाच्या एफआरपीची संपूर्ण रक्कम दिली जात नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी ही थकीत एफआरपी न दिल्यास



आयुक्तालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

त्यावर आयुक्तालयाने थकीत ३७२ कोटींच्या एफआरपीप्रश्नी १५ साखर कारखान्यांवर मार्च महिन्याच्या अखेरीस महसुली वसुली प्रमाणपत्रानुसार (आरआरसी) जप्तीच्या कारवाईचे आदेश संबंधित जिल्हाधिकार्यांना दिले होते. त्यानंतर थकीत एफआरपीप्रश्नी आयुक्तालयाने दुसर्या टप्प्यात बुधवारी

१५ सहकारी आणि १८ खासगी मिळून ३३ कारखान्यांची सुनावणी घेतली. त्यास ३० कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले, तर तीन कारखाने सुनावणीस हजर झाले नाहीत. त्या वेळी सुनावणीवेळी आयुक्तांनी कारवाईचा इशारा दिला आहे.

थकीत एफआरपीप्रश्नी कारखान्यांकडून अडचणींचा पाढा

सुनावणीमध्ये कारखान्यांच्या प्रतिनिधींनी आर्थिक अडचणींचा पाढा वाचला. कारखान्यांना बँकांकडून अल्पमुदतीचे कर्ज मंजूर झालेले नाही. केंद्र सरकारकडून साखरेचा कमी कोटा देण्यात आल्यामुळे कोट्याइतकीच साखर विक्री करण्यामुळे जादा रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही. इथेनॉल व सहवीजनिर्मिती प्रकल्पांची बिले रखडल्याने आर्थिक अडचणी आहेत. त्यामुळे शेतकर्यांना थकीत एफआरपी देण्यात अडचणी आल्याचे सुनावणीत कारखान्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

## भरधाव रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळून तरुणाचा मृत्यू; रिक्षाचालकासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्यावर भरधाव रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळून झालेल्या अपघातात रिक्षातील तरूणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात रिक्षा चालकासह अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षाचालकाने अल्पवयीन मुलाच्या ताब्यात रिक्षा चालविण्यास दिल्यानंतर हा अपघात घडला.

रितेश शिवाजी गायकवाड (वय १९, रा. गोकुळनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी रिक्षाचालक जालिंदर बबन साळुंके (वय ३५, रा. साईबाबा मंदिराजवळ, कात्रज) याच्यासह एका अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस शिपाई विठ्ठल चिपाडे (वय ३९) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिक्षाचालक साळुंके, अल्पवयीन मुलगा व गायकवाड हे तिघेही एकमेकांच्या ओळखीचे आहेत. मंगळवारी (ता.१५) ते तिघेजण रिक्षातून कात्रज-कोंढवा रस्त्यावरुन निघाले होते. त्यावेळी रिक्षाचालक साळुंकेने अल्पवयीन मुलाला रिक्षा चालविण्यास दिली.

भरधाव रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळली. अपघातात रिक्षातील तरुण रितेश गायकवाड हा गंभीर जखमी झाला. त्यास उपचारांसाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.


पोलिस तपासात रिक्षाचालक साळुंके याने अल्पवयीन मुलास रिक्षा चालविण्यास दिल्याने अपघात घडल्याचे उघडकीस आले. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# तनिषा भिसे प्रकरणात शरद पवारांच्या पक्षाने मोठं पाऊल उचललं, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या चिंतेत मोठी भर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या (झींपिश ऊाशशपरपरींह चरपसशीहज्ञरी कैंळिींरश्र) हलगर्जीमुळे गर्भवती तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला झाला असल्याचा दावा भिसेंच्या कुटुंबीयांनी केला आहे. त्यानंतर पुण्यासह राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या समित्यांच्या मार्फत सुरु आहे. त्यातील ससून रुग्णालयाचा अहवाल पुणे पोलिसांना देण्यात आला आहे. अशातच तनिषा भिसे प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे पुणे शहराचे शहराध्यक्ष जगताप यांनी दिली आहे.

प्रशांत जगताप तनिषा भिसे प्रकरणी बोलताना म्हणाले की, तनिषा भिसे




प्रकरणाच्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांनी कुटुंबाला शब्द दिला होता की, कारवाई करू. मात्र, अजूनही कारवाई ही झालेली नाही. आमच्या पक्षाच्या वतीने येणाऱ्या गुरुवारी २४ एप्रिल रोजी मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल करणार आहोत. ज्यात ससूनला देखील पार्टी करण्यात येणार आहे. दीनानाथ रुग्णालयाच्या बरोबर ससूनचे डीन आणि अधीक्षक यांना सहआरोपी करावं यासाठी याचिका दाखल करणार आहोत.

भाजपा आमदार अमित गोरखे यांच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला, एक प्रकारे तनिषा भिसे यांचा दीनानाथ रुग्णालयाने खूनच केला अशी परिस्थिती समोर आली आहे. मागच्या काही दिवसांपासून पुणे शहरांमध्ये राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. यासंबंधीच्या वेगवेगळ्या अहवालामध्ये दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी असल्याचे चित्र समोर आलं होतं. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी सुद्धा एकूणच सगळे केस पेपर पाहिल्यानंतर, होय दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणाशी संबंधित डॉक्टर सुश्रुत घैसास आणि त्यांची एकूणच टीम दोषी आहे हे सत्य समोर आलं. पण, त्यानंतर आता पुण्यातील ज्या पोर्शे कार अपघात प्रकरण त्यातील रक्ताचे नमुने बदलले त्या रुग्णालयात आलेल्या अहवालामध्ये दीनानाथ रुग्णालयाला निर्दोष सोडण्यात आले आहे.

त्याचबरोबर गेल्या काही दिवसांमध्ये मुख्यमंत्री आणि स्वतः उपमुख्यमंत्री यांनी कुटुंबाला शब्द दिला होता, आम्ही त्या रुग्णालयावरती कारवाई करू. मात्र, कोणते पोलीस स्टेशनमध्ये त्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने आम्ही २४ एप्रिलला येणाऱ्या गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयामध्ये याबाबत गुन्हा दाखल करण्याची याचिका आणि त्यामध्ये देखील ससूनला पार्टी करण्यात यावं. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल व्हावा, त्यांची सनद रद्द करावी. ही मागणी तर आहेच, मात्र पोर्शे कार अपघात प्रकरणापासून ललित पाटील किंवा आता दीनानाथ मंगेशकर प्रकरण असेल याबाबत ससूनचे डीन आणि एकूणच संबंधित आणि इतर जे यामध्ये सामील आहेत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे अशी मागणी करणार आहे. त्याचबरोबर जो माणूसकीचा अंत झाला आहे, त्याच्या विरोधात याचिका दाखल करणार आहे आणि हा लढा आमचा चालू राहणार असल्याचा देखील प्रशांत जगताप यांनी सांगितला आहे.